02 To 08 JANUARY 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 12/31/2022 8:40 PM Page 1
CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : २ सोमवार दि. ०२ जानेवारी २०२२ ते रविवार दि. ०८ जानेवारी २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## परदेशी लपलेला बिळातून बाहेर पडला चौघांचा मारेकरी २८ वर्षांनी सापडला

मुंबई/क्राईम रिपोर्टर

कोणताही गुन्हा आणि गुन्हेगार कधीच लपून राहू शकत नाही तो कधी ना कधी पोलिसांच्या तावडीत सापडतो. १९९४ साली मुंबई नजीकच्या पेणकर पाडा येथे एका महिलेची तिच्या ३ मुलांसह हत्या करून पळालेल्या तीनपैकी एका आरोपीला तब्बल २८ वर्षांनी पोलिसांनी ताब्यात घेतले असून आता त्याच्या दोन साथीदारांचा पोलीस तपास करीत आहेत.

राजकुमार चौहान आणि सरोज बंधू हे १९९४ च्या ...पान ६ वर

# पोलिसांच्या हाकेला अखेर पांडुरंगच धावला वारकऱ्याच्या वेशातील खुनी ५० वर्षांनी गावला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

पूर्वी असे म्हटले जायचे कि या जन्मात केलेले पाप पुढच्या जन्मात फेडावे लागते. पण आता मात्र तसे नाही. आता इथेच करा आणि इथेच भरा अशी स्थिती आहे. त्यामुळे आरोपी किती जरी शातीर दिमाग असला तरी कानून के हात बडे लंबे होते है, त्यानुसार एखाद्या आरोपीने गुन्हा करून किती वर्ष जरी पोलिसांना चकवले तरी कधीना कधी तो पोलिसांच्या हाती लागतो. मात्र काही गुन्हेगारांना वाटते कि आपण बरीच वर्ष लपून राहिलो तर आपली फाईल बंद होईल आणि तो गुन्हा आपल्याला सहज पचवता येईल. पण शेवटी काही गोष्टींवर साक्षात देवाचेही लक्ष असते आणि त्याच्या दरबारात नेहमीच सत्याचा विजय होतो. काही लोक असे असतात कि करून भागतात आणि उतार वयात देवपूजेला लागतात. पण अशा लोकांवर देवाचीही नजर असते आणि योग्य वेळी देवच त्यांना अलगद पोलिसांच्या जाळ्यात अडकवतो. पण देवा धर्माच्या भजन कीर्तनात रमलेल्या धार्मिक प्रवृत्तीच्या माणसाचे विचार सात्विक असल्याने आपल्या आजूबाजूला कोण वावरतोय याची त्यांना कल्पना नसते. आपल्या बरोबर वावरणाऱ्या लोकांना ते आपल्या सारखेच धार्मिक प्रवृत्तीचे समजत असतात आणि तिथेच त्यांची फसगत होते. अहमदाबादवरून एका महिलेचा खून करून पाळलेला एक अट्टल चोर चक्क वारकरी बनून रांजणी गावात राहत होता. धोतर कुर्ता डोक्यावर टोपी कपाळाला गंध आणि मुखी हरिनामाचा गजर करीत दरवर्षी वारकऱ्यांच्या दिंडी सोबत वारीला जात होता. पण कुणालाही पुसटशी सुद्धा कल्पना नव्हती कि आपल्या सोबतचा वारकरी एक फरारी खुनी गुन्हेगार आहे. पण साध्याभोळ्या वारकऱ्यांनी भलेही त्याला ओळखले नसले तरी पांडुरंगाची त्याच्यावर नजर होती आणि तब्बल ५० वर्षांनी वारकऱ्याच्या वेशातील हा खुनी इसम साक्षात पांडुरंगाच्या कृपेने पोलिसांच्या तावडीत सापडला. यालाच म्हणतात ईश्वराच्या लाठीचा न्याय जी दिसत नसली तरी योग्य वेळी पाप करणाऱ्याच्या पाठीत बसते आणि पाप पुण्याचा न्याय करते.







कर्माचे भोग सुटत नाही आणि सत्य लपत नाही असे म्हटले जाते. मनुष्याला त्याच्या कर्माचे भोग योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी भोगण्याची वेळ नियती न चुकता आणत असते. परमेश्वराच्या दरबारात न्याय नक्की मिळतो मात्र तो उशिरा मिळतो असे म्हटले जाते. उशीरा मिळालेला न्याय हा न्याय नसतो असे देखील म्हटले जाते. मात्र परमेश्वराच्या दरबारात मिळणारा न्याय उशिरा नव्हे तर ठरलेल्या वेळी आणि योग्य प्रमाणात मिळत असतो. त्याच्या मापात पाप नसते आणि ती वेळ देखील बिनचूक असते. सिताराम तात्याबा भताने हा ७३ वर्ष वयाचा वृद्ध अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील रांजणी या गावात रहात होता. सिताराम भताने हा दरवर्षी पंढरपूरच्या वारीला न चुकता जात असे. दरवर्षी आषाढी एकादशी आली म्हणजे तो वारकऱ्यांसोबत दिंडीत सहभागी होत असे. अंगात धोतर आणि नेहरु शर्ट, डोक्यावर गांधी टोपी, खांद्यावर उपरणे, उजव्या हातात भगवा गंडा, कपाळावर काळा बुक्का आणि भगवा गंध असा या सिताराम भताणेचा पेहराव होता. गावातील भागवत सप्ताहात देखील तो नित्यनेमाने सहभागी होत असे. ...पान २ वर

# खोटे बोलून त्याला अज्ञातस्थळी नेले पैशांसाठी भंगारवाल्याला ठार केले





भिवंडी/एस.कुमार

१३ नोव्हेंबर २०२२ चा तो दिवस. ७.३० वाजताची वेळ. मांडवी पोलीस ठाण्याचे हद्दीतील तिल्हेर, घुमाळपाडा गावातील लोक आपापल्या कामात मग्न होते. कोणी आपल्या घरासमोर झाडाझुड करत होते तर कोणी घरातील कामे करत होते. कोणी लगबगीने प्रांत विधीसाठी जात होते. इतक्यात गावातील मंडळी कुजबुज करीत होती. गावातील काही हौशी मंडळी आपल्याला माहीत झालेल्या घटनेची खात्री करण्यासाठी तिल्हेर, घुमाळपाडा येथील पारोळ भिवंडी रोड पासून अंदाजे २० फुट अंतरावर असलेल्या टक्करभाई यांच्या विटभट्टी जवळ, पोहचली. तेथील कच्चा रोडवर अंदाजे २१ वर्षीय वयोगटातील तरुणाचा मृतदेह पडलेला दिसला. तो मृतदेह बघून गावातील लोकांनी धूम ठोकली. काहींनी ही घटना बुरुडपाडा, तिल्हेर गावचे सरपंच रामदार बुरुड यांच्या कानावर घातली. घटनेची खात्री करण्यासाठी ते घटनास्थळी दाखल झाले. समोरील दृश्य बघून तेही चक्रात पडले. त्यांनी क्षणाचा विलंब न करता या घटनेची खबर मांडवी पोलिसांना दिली. सकाळी सकाळी तिल्हेर गावात खून झाल्याची घटना पोलिसांना समजली. घटनेचे गंभीर स्वरूप पाहता पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी आल्याबरोबर प्रथम प्रेताची बारकाईने निरीक्षण करण्यात सुरुवात केली. प्रेत सरळ केले असता, तेव्हा उपस्थित लोकांच्या तोडून एकच वाक्य बाहेर आले, अरे हा तर नालासोपारा (पूर्व)कडील रफीक कम्पाऊन्ड, वाकणपाडा, पेल्हार मधील कमरुद्दीन गयासुद्दीन चौधरी, काहींनी त्याला ओळखलं. आणि मृतक तरुणाची ओळख पटली. कोणी तरी त्याच्या डोक्याचे समोरली बाजूस व मागील बाजूस तसेच उजव्या डोळ्यावर मारहाण करुन ...पान २ वर

## प्रियकरासाठी रक्ताच्या नात्याचा बळी दिला पोटच्या पोरीने जन्मदात्या आईचा खून केला

ठाणे/क्राईम रिपोर्टर

प्रेम आंधळे असते असे म्हटले जाते पण आता आंधळे प्रेम करणारी तरुण मुले किती कृतगन असतात हेच बघायला मिळत आहे. अल्पवयीन मुलीच्या प्रेमाला तिच्या आईचा विरोध होता. त्यामुळे चिडलेल्या मुलीने रक्ताच्या नात्याचा जराही विचार न करता सरळ प्रियकराच्या मदतीने जन्मदात्या आईचाच खून केला या प्रकरणी पोलीस फरारी तरुणी आणि तिच्या प्रियकराचा शोध घेत आहेत ङ्गङ्गङ्गठाणे जिल्ह्यात आई-मुलीच्या नात्याला काळिमा फासला गेल्याची घटना समोर आली आहे. मुंब्रा परिसरात एका १७ वर्षीय मुलीने आपल्या प्रियकराच्या मदतीने आपल्या आईची निर्घृण हत्या केली. मृत महिलेला तिची मुलगी आणि प्रियकर यांच्यातील संबंधांवर आक्षेप होता. मुंब्रा पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आई आपल्या प्रेम प्रकरणावरुन सतत टोचत असल्याच्या रागातून अल्पवयीन मुलीने तिची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुलीने आपल्या प्रियकराच्या मदतीने धारदार शस्त्राने वार करुन आईचा खून केल्याचा आरोप आहे. ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा शहरात हा प्रकार घडला आहे. हत्येनंतर मुलगी आणि तिचा प्रियकर हे दोघेही जण पसार झाले आहेत. मुंब्रा पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करुन घेतला असून फरार आरोपींचा शोध घेत आहेत. ...पान ६ वर

# जमिनीच्या वादाचा भयंकर शेवट झाला चुलत्याच्या मुलानेच न्यासचा घात केला

सातारा (वाई)/क्राईम रिपोर्टर



मयत न्यास

वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून रक्ताची नाती तुटतात आणि कुटुंबातील लोकच एकमेकांच्या जीवावर उठतात. त्यामुळे हे वाद लवकर मिटवले नाही, तर पुढची पिढी सुद्धा या वादात ओढली जाऊन बरबाद होते. वाई येथे राहणार शिवाजी खरात याचा वडिलोपार्जित जमिनीवरून त्याच्या चुलत भावाशी वाद होता. पुढे याच वादातून त्यांच्या मुलांमध्ये दुष्मनी सुरु झाली. मात्र शिवाजी खरात याचा मुलगा न्यास हा सुशिक्षित होता त्याला हा वाद मिटवायचा होता. त्याने प्रयत्न केले, पण त्याच्या याच प्रयत्नांमुळे तो शिवाजीच्या चुलत भावांच्या मुलाचा दुश्मन बनला आणि एके दिवशी संधी साधून त्यांनी न्यासची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



वाई येथे शिवाजी खरात हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. त्याच्या वडिलार्जीत जमीन विषयी त्याच्याबरोबर त्याच्या चुलत भावाचे वाद गेली बरीच वर्ष चालू आहे. या वादातून त्यांची बऱ्याचवेळेला भांडणे झालेली असली तरी हा वाद काही केल्या मिटत नव्हता. पोलीस स्टेशनची पायरी आणि कोर्टाची पायरी दोन्ही कुंटूबियांनी चढलेली होती. हा वाद त्यांच्या दुसऱ्या पिढीत म्हणजे त्याच्या मुलांच्यात ही वाढला होता. दोघांची ही मुले या वादातून एकमेकाला भिडली असल्याने कोण कोणाला बघून घेतो असे त्यांचे झाले होते. शिवाजी खरात यांचा मुलगा न्यास हा शिरवळ येथील एका महाविद्यालयात बारावीचे शिक्षण ...पान २ वर

## पैसे कमवण्याचा एक नवीनच फंडा लग्न जमवण्याच्या बहाण्याने दोघांना गंडा

कुरूंदवाड/क्राईम रिपोर्टर

कुरुंदवाड शहरातील विकास मोगणे याचे लग्न गेल्या काही वर्षापासून जमत नव्हते. तो आणि त्याच्या घरचे लोक लग्न जमविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होते. परंतु कुठे तरी माशी शिंकत होती. बराच प्रयत्न करून ही त्याचे लग्न काही जमत नव्हते. त्याचे लग्नाचे वय ही जात होते. तो सगळ्या पै-पाहुण्यात नातेवाईकांत प्रयत्न करून बसला होता. अशावेळी त्याच्या घरच्या लोकांचा संपर्क सांगली जिल्हयातील खानापूर तालुक्यातील सुलतानगोदे येथील वर्षा जाधव याच्याशी आला.

वर्षा जाधव या लग्न जमविण्याचा व्यवसाय करीत होत्या. त्याच्याकडे वधु वरांची यादीच होती. न जमणारी लग्न त्यांनी जुळवून आणली होती. एक लग्न जमविण्यासाठी त्या लाखांच्या घरात रक्कम घेत होत्या. विकास याच्या घरच्या लोकांचा संपर्क त्याच्याशी आल्यावर त्यांनी विकास याचे लग्न मी जमवुण आणते. माझ्याकडे विकाससाठी त्याला अनुरूप होईल अशी मुलगी आहे त्यासाठी प्रयत्न करते मुलीच्या घरची परिस्थीती ही गरिबीची आहे.लग्नात ते काही खर्च करू शकत नाहीत तुम्ही लग्नात खर्च करून मुलीच्या घरच्या लोकांना व मला पैसे दिलेत तर मी विकासचे लग्न जमवुण आणते असे त्यांनी सांगितले. एक तर विकासचे वय होत होते कुठून तरी तसे तरी त्याचे लग्न जमविले पाहिजे म्हणून त्याच्या ...पान २ वर

# प्रेमात अडथळा येताच ड्रायव्हरचे डोके फिरले देखण्या वहिनीसाठी मामेभावालाच ठार मारले

गोवा (वास्को)/क्राईम रिपोर्टर



एखाद्या बाईची नवऱ्याकडून इच्छा पूर्ण होत नसेल तर ती जास्त वेळ अतृप्त राहू शकत नाही. कारण तिला तृप्त करणारा कुणीतरी हवा असतो. वास्को येथील संजयची पत्नी सुनिता हिचे सुद्धा तसेच झाले होते. दारुड्या नवऱ्याकडून तिला सुख मिळत नव्हते म्हणून तिने नवऱ्याच्या मामेभावाला जवळ केले. मात्र एके दिवशी संजयने दोघांना त्याने रंगेहात पकडताच तो चिडला आणि त्याने पत्नीला मारहाण केली. तसेच नात्याला कलंक लावणाऱ्या भावावरही हल्ला केला. पण तो तयारीत असल्याने त्याने अंगावर चालून आलेल्या सुनीताच्या पतीला म्हणजेच आपल्या मामेभावाला भोसकून ठार मारले. या प्रकरणी आरोपी ड्रायव्हरला पोलिसांनी अटक केली आहे.

संजय यादव हा मुळचा उत्तरप्रदेशातील गेल्या काही वर्षापुर्वी तो रोजगाराच्या निमित्याने गोव्यातील वास्को जवळील झुआरीनगर येथे पत्नी तीन मुलासह राहयला आला. तो मिळेल ते काम करून आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करीत होता.त्याची पत्नी सुनिता (काल्पनिक नांव) ही दिसायला देखणी सुंदर होती. तशी ती चालू ही होती. तिच्या मनात एखादा तरूण भरला की,ती त्याला लाईन देत होती. संजय हा सकाळी कामाला गेली की रात्री उशिरा घराकडे परतत होता. ती ही अलिकडे रोजंदारीसाठी बाहेर पडू लागली होती. ती एकीकडे तर तो एकीकडे कामाला जात होते. तिचे आठवडयातून तीन चार दिवसच काम असायचे.त्यामुळे घरात ती एकटीच असायची. त्याच्या घरात नेहमी त्याचा मामेभाऊ कन्हैयालालचे येणे जाणे असायचे त्याची बायाको मुले ही त्याने गावाकडे उत्तरप्रदेशात सोडली होती. त्यामुळे गोव्यात तो एकटाच राहत होता. गोव्यात तो ट्रक ड्रायव्हरचे काम करीत होता. तो मुरगाव बंदरातील कोळयाशी वाहतुक सावर्डे येथे करीत होता. ...पान ६ वर

# मनाविरुद्ध लग्न झाल्याने शीतल चिडली गळा दाबून तिने पतीचीच हत्या केली

बीड/क्राईम रिपोर्टर



मयत पांडुरंग

कोणत्याही मुलीचे लग्न जुळवताना तिच्या इच्छा अपेक्षांचाही विचार करायचा असतो. पण कधी कधी एखादे चांगले स्थळ आले कि मुलीचे आई-वडील मुलीच्या पसंतीची परवा न करता सरळ लग्न लाऊन देतात. पण पुढे काय होईल आपली मुलगी सासरी नांदेल कि नाही याचा जराही विचार करीत नाहीत. निपाणी जवळका तांडा गावात पांडुरंग चव्हाण याचे शीतल जाधव नावाच्या मुलीशी लग्न झाले होते, पण शीतलला पांडुरंग आवडत नव्हता. तरीही तिचे लग्न लावून देण्यात आले. पण काही दिवसातच शीतलने स्वतःच्या हाताने पतीचा गळा दाबून त्याची हत्या केली. या प्रकरणी आरोपी शीतलला पोलिसांनी अटक केलेली आहे.



राजाभाऊ आणि निलाबाई चव्हाण यांचा मुलगा पांडुरंग हा लग्नायोग्य झाला होता. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील निपाणी जवळका तांडा या गावात हे दाम्पत्य राहण्यास आहे. या दाम्पत्याच्या मोठ्या मुलीचे लग्न झाले असून ती सासरी सुखाने संसार करत आहे. मुलगा पांडुरंग हा लग्नायोग्य झाल्यामुळे साहजीकच त्याच्या लग्नासाठी वधू संशोधन सुरु होते. गेवराई तालुक्यातच असणारी पौळाचीवाडी गावातील शितल पांडुरंगला पसंत पडली. शितल ही बंडू जाधव यांची मुलगी. ती १९ वर्षाची होती. चव्हाण कुटुंबाने जाधव कुटुंबाला होकार कळवला. तेंव्हा त्यांनाही आनंद झाला. आपल्या मुलीला पसंत केल्याने त्यांनीही लगेच लग्नाची तयारी केली. पण त्यांनी आपल्या मुलीच्या मनात काय चालले आहे, तिला पांडुरंग आवडला आहे का नाही याचा विचार केला नाही. मुलाने मुलगी पसंत केल्याने त्यांनी लग्नाची जय्यत तयारी केली. तिथे मुलीच्या मनाचा विचारच केला गेला नाही. समाजात अनेक ठिकाणी अशा घटना घडतात. आई-वडीलांसमोर काही बोलता येत नाही म्हणून मुली तोंड बंद ठेवतात. पण मनातील नाराजीमुळे आयुष्यभर त्यांच्या संसारातील तंटा मिटत नाही. पती-पत्नीत कधीच प्रेम विश्वास निर्माण होत नाही. ...पान ६ वर

CMYK

02 To 08 JANUARY 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/31/2022 8:41 PM Page 1



पान १ वरून....

## पोलिसांच्या हाकेला अखेर ...

एकंदरीत तो देवध्यानी असल्याचे लोक समजत होते. मात्र त्याच्यातील सैतानी वृत्ती कुणाला माहिती नव्हती. एके दिवशी त्याच्या दारात अहमदनगरच्या पाथर्डी पोलिसांचे पथक दाखल झाले आणि त्याचे सत्य बाहेर आले. समोर उभा असलेला इसम सिताराम तात्याबा भताने हाच असल्याची पोलिस पथकाने खात्री पटवली. खात्री पटल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. अटकेनंतर त्याला गुजरात पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सन १९७३ चा तो काळ होता. गुजरातच्या अहमदाबाद सिटी सैजपुरातील धनुसह्यादी सोसायटीच्या इमारतीत मनीबेन शुक्ला नावाची सत्तर वर्ष वयाची वयोवृध महिला रहात होती. वयोवृद्ध मनीबेन शुक्ला त्या इमारतीची मालकीन होती. त्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील सिताराम तात्याबा भताने हा भाड्याने रहात होता. आज ७३ वर्ष वय असलेला सिताराम भताने त्यावेळी सन १९७३ मधे तेवीस वर्षाचा होता. ऐन तारुण्याच्या उमेदीत सिताराम भताने यास चो-या, घरफोड्या करण्याचा नाद लागला होता. दिनांक ११ सप्टेबर १९७३ चा तो दिवस उजाडला. या दिवशी सितारामने घरमालकीन मनीबेनच्या घरात चोरी करण्याच्या उद्देशाने प्रवेश केला. मनीबेन झोपेत असल्याची संधी साधत त्याने शिताफीने तिच्या घरातील किंमती ऐवज आणि रक्कम चोरली. चोरलेली रक्कम ताब्यात घेत तो बाहेर पडत असतांनाच मनीबेन शुक्ला या वृद्ध महिलेला जाग आली. इमारत मालकीन मनीबेन ओरडण्याच्या तयारीत असतांनाच सितारामने तिच्यावर धारदार शस्त्राने घाव घातले. त्या धारदार घावात मनीबेन जागेवरच मरण पावली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मनीबेनचा मृतदेह तसाच सोडून सितारामने दरवाजाला बाहेरुन कुलूप लावून पलायन केले. दरम्यान मनीबेनची हत्या केल्यानंतर चार दिवसांनी तिच्या घरातून दुर्गंधी बाहेर येण्यास सुरुवात झाली होती. मनीबेन ही महिला कुठेतरी बाहेर गेली असेल असा आजुबाजुच्या लोकांचा अगोदर समज झाला होता. मात्र तिच्या बंद घरातून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे या बंद घरात मनीबेनचा घातपात झाला असावा अशी शंका शेजारच्या लोकांना येवू लागली. याच कालावधीत वरच्या मजल्यावर राहणारा सिताराम भताने हा देखील गायब होता. परिसरातील रहिवाशांनी सैजपूर हद्दीतील सरदारपूर पोलिस स्टेशनला या घटनेची माहिती दिली. सरदारपूर पोलिस स्टेशनचे पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मनीबेनच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरात रक्ताच्या थारोळ्यातील मनीबेन या महिलेचा मृतदेह कुजण्यास सुरुवात झाली होती. तिच्या मृतदेहाची सर्वत्र दुर्गंधी पसरली होती. हा हत्येचा प्रकार उघड झाल्यानंतर जागेवरच पोस्टमॉर्टम उरकण्यात आले. घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा पुर्ण करण्यात आला. सन १९७३ चा तो काळ होता. मोबाईल, सीसीटीव्ही फुटेज, आधार कार्ड हा कोणताही प्रकार त्या काळात उपलब्ध नव्हता. इमारत मालकीन मनीबेन शुक्ला यांची धारदार शस्त्राने हत्या झाल्याचे उघड झाले होते. या इमारतीमधील भाडेकरी सिताराम तात्याबा भताने हा गायब झाला होता. त्यामुळे संशयाची सुई त्याच्यावर स्थिरावली होती. सत्तर वर्षाच्या मनीबेनच्या घरात शेवटी जाणारा आणि त्यांच्या घराला बाहेरुन कुलूप लावणारा सिताराम भताने हाच असल्याचे पोलिस तपासात उघड झाले होते. मनीबेनची हत्या केल्यानंतर पोलिसांच्या धाकाने त्यावेळी २३ वर्षाचा सिताराम गुजरात राज्यात इकडे तिकडे फिरत राहिला. काही कालावधीनंतर तो महाराष्ट्रात आपल्या मुळ गावी अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील रांजणी येथे राहण्यास आला. या कालावधीत गुजरातच्या सरदारनगर पोलिस स्टेशनच्या शोध पथकाने सिताराम भताने यास शोधण्याचा बराच प्रयत्न केला. मात्र तो पोलिसांच्या हाती लागला नाही. काळ पुढे सरकत गेला. मनीबेनचा मारेकरी सिताराम भताने सापडत नव्हता. हळूहळू त्याचा तपास थंड बस्त्यात गेला. आपला खून पचल्याच्या अविर्भावात इकडे सिताराम मोकाट फिरत होता. अहमदनगर जिल्ह्यात आल्यानंतर देखील सितारामच्या गुन्हेगारी कारवाया सुरुच होत्या. लहान मुलांच्या अंगावरील दागिने ओरबाडून पलायन करण्यासह बलात्काराचा गुन्हा देखील त्याने नंतरच्या कालावधीत केला. काळ पुढे पुढे सरकत होता. बघता बघता गुजरात पोलिसांच्या शोध पटलावरुन मनीबेनच्या हत्येचा तपास बाजूला पडला. सरदारनगर पोलिस स्टेशनला अनेक प्रभारी पोलिस अधिकारी आले आणि बदलून गेले. चाळीस वर्षानंतर १४ ऑगस्ट २०१३ रोजी मनीबेन शुक्ला या वयोवृद्ध महिलेच्या खूनातील संशयीत आरोपी सिताराम भताने याचे न्यायालयातून अटक वारंट निघाले. पुन्हा सरदारपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी-कर्मचारी कामाला लागले. मात्र तपास पुढे सरकला नाही. पुन्हा काही दिवसांनी तो तपास थंड बस्त्यात गेला. सन १९७३ ते सन २०२२ हा जवळपास पन्नास वर्षाचा कालावधी उलटला. या कालावधीत सिताराम आता ७३ वर्षाचा झाला होता. तो त्याच्या मुळगावी अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील रांजणी या गावी रहात होता. वयोमानाप्रमाणे त्याच्या राहणीमानात बदल झाला. पँटच्या जागी धोतर, शर्टाच्या जागी नेहरु शर्ट आणि डोक्यावर गांधी टोपी आली होती. कपाळावर काळा बुक्का आणि भगवा टिळा, उजव्या हातात भगवा दोरा बांधून तो वारकऱ्यासारखा वावरत होता. वयोमानानुसार त्याच्या हातात काठी आली होती. दरवर्षी आषाढी कार्तिकीला तो पंढरपुरच्या वारीत जात होता. आता आपला गुन्हा पुसला गेला असे त्याला मनातल्या मनात वाटत होते. मात्र पंढरपूरचा विठोबा हे सर्व बघत होता. त्याच्या कर्माचे फळ भोगण्याची वेळ आता जवळ आली होती. याच जन्मी कर्म आणि याच जन्मी फळ हा निसर्गाचा नियम त्यालादेखील लागू होता. अहमदाबाद सिटी हद्दीतील सरदारनगर पोलिस स्टेशनला त्याच्याविरुद्ध गु.र.न. ४५८/१९७३ भा.द.वि. ३०२ आणि ३८२ नुसार गुन्हा दाखल होता. पोलिस निरीक्षक पी. व्ही. गोहील यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये सरदारनगर पोलीस स्टेशनचा कारभार आपल्या हाती घेतला. कडक शिस्तीचे पोलिस अधिकारी पी.व्ही. गोहील यांनी पेंडींग गुन्ह्यांचा आढावा घेण्यास सुरुवात केली. पेंडींग गुन्ह्यात त्यांना सन १९७३ सालचा पन्नास वर्ष जुना गुन्हा आढळला. मनीबेन शुक्ला या वयोवृद्ध महिलेचा खून करणारा संशयीत आरोपी पन्नास वर्षांपासून मोकाट कसा फिरतो या प्रश्नाने त्यांचे डोके बिथरले. आज पन्नास वर्ष अर्थात पाच दशके उलटली तरी देखील मनीबेन शुक्ला या वयोवृद्ध मयत महिलेला पोलिस खात्याकडून न्याय कसा मिळाला नाही हा प्रश्न त्यांना सतावू लागला. त्यांनी तातडीने सिताराम तात्याबा भताने या नावाने कुणाला आधार कार्ड दिले आहे का याची ऑनलाईन पडताळणी करण्याचे आदेश दिले. या पडताळणीत महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील रांजणी या गावी या नावाचे आधार कार्ड जारी झाले असल्याची माहिती समोर आली. पोलिस निरीक्षक पि.व्ही. गोहील यांनी तातडीने अहमदाबाद जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या माध्यमातून अहमदनगर पोलिस अधिक्षक राकेश ओला यांच्याशी संपर्क साधत मदत मागितली. गुजरातच्या पोलिस अधिक्षकांनी महाराष्ट्रातील पोलिस अधिक्षकांना संपर्क साधल्यानंतर पोलिस यंत्रणा जोमाने कामाला लागली. अहमदनगरचे एलसीबी पीआय अनिल कटके यांच्या मार्फत पाथर्डी पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सुहास चव्हाण यांना सिताराम भताने यास चौकशीअंती ताब्यात घेण्याचा लेखी निरोप आला. पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण पाटील, पोलीस नाईक रामदास सोनवणे, निलेश म्हस्के, कर्मचारी अतुल शेळके, भारत अंगरखे अशी टीम रांजणी गावी धडकली. सुरुवातीला खबऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. सर्व तपासाअंती या गावात सिताराम तात्याबा भताने नावाचा ७३ वर्ष वयाचा वृद्ध रहात असल्याचे उघड झाले. त्याच्या कर्माची शिक्षा भोगण्याची वेळ आता जवळ आली होती. काठी टेकत टेकत चालणाऱ्या वारकऱ्याच्या वेशातील सिताराम भताने यास ताब्यात घेण्यात आले. त्याचा सैतानी इतिहास जगासमोर आला. त्याला ताब्यात घेतल्याची माहिती गुजरात पोलिसांना देण्यात आली. गुजरातच्या सरदारनगर पोलिस स्टेशनचे पथक अहमदनगरच्या पाथर्डी पोलिस स्टेशनला दाखल झाले. गुजरात पोलिसांनी त्याला अटक केली. तुम्ही मला कसं शोधलं. मला खूनाची घटना आठवत देखील नाही अशी प्रतिक्रिया ७३ वर्षाच्या सिताराम भताने याने पोलिसांना दिली. कानूनके हात बडे लंबे होते है, वर्दीका कपडा भी इन लंबे हातोको कभी कभी कम पड जाता है असे अनेकदा म्हटले जाते. कायद्याचे हात खरोखरच लांब असतात या वाक्याचा प्रत्यय सिताराम भताने यास आला असेल. तरुणपणात केलेल्या गुन्ह्याची शिक्षा त्याला वयाच्या सत्तरीत मिळाली. सत्तरीतील मनीबेनच्या खूनाची शिक्षा सितारामला वयाच्या सत्तरीतच मिळाली हे या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते. उशिरा मिळालेला न्याय हा न्याय नसतो असे म्हटले जाते. परमेश्वराच्या दरबारात न्याय उशिरा मिळतो असे देखील म्हटले जाते. मात्र तो न्याय बिनचूक मिळतो हे देखील नाकारता येत नाही. परमेश्वर न्याय देण्यासाठी प्रत्येक ठिकाणी पोहोचू शकत नाही. तो तुमच्या आमच्या आणि पोलिसांच्या माध्यमातून संबंधीतापर्यंत पोहोचत असतो.

## खोटे बोलून त्याला अज्ञातस्थळी...

त्यास जिवे ठार मारले होते. या प्रकरणी पोलीस पाटील रामदार रघुनाथ बुरुड (वय ५३) रा. बुरुडपाडा, तिल्हेर, ता. वसई जि. पालघर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मांडवी पो.स्टे. येथे गु.र.क्र.नं. १६६/२०२२ भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान पोलिसांनी पंचनामा करून गुन्हयातील मृतक तरुणाच्या मृत्युचे निश्चीत कारण समजण्यासाठी तो मृतदेह पोस्टमार्टम करण्याकरता मुंबई येथील सर जे.जे. हॉस्पीटल येथे पाठविण्यात आला. मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलीस आयुक्त सदानंद दाते, अपर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, स.पो.निरी. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा. फौज, रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा.रमेश अलदर, महेश पागधरे, चंदन मोरेइत्यादी या गुन्ह्याचा तपास करू लागले. दरम्यान जे. जे. रुग्णालयाचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला होता. डॉक्टरांनी मयत कमरुद्दीन चौधरी याच्या डोक्यात बंदुकीने गोळी झाडल्याने त्यात त्याचा मृत्यु झाल्याचे नमुद केले.त्यामुळे या मागे कुठल्या तरी गुन्हेगारी टोळीचा समावेश असावा असा तर्क बांधून गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपासला आणखी वेग दिला. सदर गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने तो उघडकीस आणणे पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. हा गंभीर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांनुसार गुन्हे शाखा, कक्ष २ वसई यांनी वेगवेगळी तपास पथके तयार केली. पोलिसांनी मयत कमरुद्दीन चौधरी राहत असलेल्या वाकणपाडा परीसरामध्ये त्याच्या नातेवाईक व मित्रांकडे चौकशी केली. तेव्हा कमरुद्दीन हा त्याच परीसरातील मोहम्मद सुफीयान झाकीर हुसेन शेख याच्यासोबत घटनेच्या अगोदर भिवंडी येथे गेल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी मोहम्मद सुफीयान यास ताब्यात घेतले .त्यास पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली. तेव्हा त्याने कमरुद्दीन चौधरी याचा त्याचे मित्र नदीम इक्बाल अब्दुल अहमद शेख आणि जिसान उर्फ सोनू जावेद खान यांच्या मदतीने खून केल्याची कबुली दिली.गुन्हे शाखेच्या पथकाने जलद हलचली करून जिसान उर्फ सोनू यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे नदीम बाबत चौकशी केली असता, तो त्याच्या मुळगावी बिहार राज्यातील मोतीहारी या गावी रेल्वेने जात असल्याची माहिती मिळाली.या बाबत गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना अवगत करुन त्यांचे मार्गदर्शनाखाली भुसावळ रेल्वे पोलीसांना या आरोपी विषय माहिती देण्यात आली. भुसावळ रेल्वे स्टेशनचे प्रभारी पो. निरी. विजय घेरडे यांनी पथकासह नदीमचा शोध घेत त्याला ताब्यात घेतले. यावेळी त्याच्या कडे गुन्हयात वापलेली गावठी कट्टा व ३५ जिवंत काडतुसे मिळून आली. अशा प्रकारे गुन्हे शाखेच्या पथकाने या गुन्ह्यातील संशयित आरोपी नदीम इक्बाल अब्दुल अहमद शेख (वय ३५) रा. रिद्धी सिध्दी चाल, रशिद कम्पाउन्ड, नालासोपारा (पूर्व), मोहम्मद सुफीयान झाकीर हुसेन शेख, (वय २२) रा. रफीक कम्पाउन्ड,चाकणपाडा, हिल साईडचे स्कुलचे बाजुला, वाकणपाडा, नालासोपारा (पूर्व) आणि जिसान उर्फ सोनू जावेद खान (वय १८) रा. मिश्रा कम्पाउन्ड, धानीवचाग तलावाचे बाजुला, नालासोपारा (पूर्व) या तिघांना १५ नव्हेंबर रोजी अटक करून त्यांच्या ताब्यातून १ गावठी कट्टा व ३६ जिवंत काडतुसे, मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले. आता प्रश्न होता तो म्हणजे या तिघांनी कमरुद्दीन चौधरी या तरुणाची हत्या का केली आणि कशी केली? या बद्दल जाणून घेतले असता धक्कादायक माहिती पुढे आली. कमरुद्दीन चौधरी हा भंगार व्यवसायिक पैशाच्या हव्यासापोटी मोहम्मद सुफीयान झाकीर हुसेन शेख आणि त्याचे मित्र नदीम इक्बाल अब्दुल अहमद शेख आणि जिसान उर्फ सोनू जावेद खान या दोघांच्या मदतीने कमरुद्दीन चौधरी यास भिवंडी येथे भंगाराचा माल दाखविण्याचा बहाणा करून घेऊन गेले. सुफीयान याने त्याच्या मोटार सायकलवर कमरुद्दीन यास मध्यभागी बसविले आणि वाकणपाडा येथून ते १४ नोव्हेंबर रोजी भिवंडी कडे निघाले. तिल्हेर, घुमाळपाडा येथील पारोळ भिवंडी रोड पासून अंदाजे २० फुट अंतरावर असलेल्या टक्करभाई यांच्या विटभटटी जवळ,कच्च्या रस्त्यावर मोटरसायकल वर पाठीमागे बसलेल्या नदीम इक्बाल अब्दुल अहमद शेख याने त्याच्या जवळील गावठी पिस्तुलातून मयताच्या डोक्यात पाठीमागून दोन गोळ्या झाडल्या.रक्तबंबाळ झालेल्या कमरुद्दीनला गाडीवरून जमीनीवर खाली पडला आणि त्यातच तो मरण पावला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळवरून पळ काढला. पैशाच्या लालचेने ऐशआरामात आयुष्य जगायचे,अशी सुखस्वप्ने रंगवणाऱ्या या तिघांच्या हातात अखेर बेडी पडली. मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलीस आयुक्त सदानंद दाते, अपर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, भुसावळ रेल्वे पोलीस ठाण्याचे प्रभारी पो. निरी. विजय घेरडे, स.पो.निरी. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा. फौज, रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा.रमेश अलदर, महेश पागधरे, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.कॉ. अमोल कोरे, सर्व गुन्हे शाख्ना, कक्ष २ वसई तसेच भुसावळ रेल्वे पोलीस ठाण्याचे पो.उ.निरी. संजय साळुखे, पो.हवा. खंदारे, तडवी, ठाकुर, मुंडे, शेजवळकर इत्यादींनी पार पाडलेली आहे.

## जमिनीच्या वादाचा भयंकर शेवट ...

घेत होता. त्याचबरोबर तो लष्कर आणि पोलीस भरतीसाठी प्रयत्न ही करीत होता. त्यासाठी त्याला त्याचे घरातील लोक ही मदत करीत होती. त्याला त्यासाठी पैशाची कमतरता ही ते भासू देत नव्हते. न्यासला देखील आपल्या भावकीतील भाऊबंदाबरोबर असलेल्या जमीनीचा वाद माहित होता. तो ही आता सज्ञान झालेला होता. त्याला वाटत होते की आता हा वाद कसा तरी मिटायला हवा. भांडूण किंवा कोर्ट कचेरीची पायरी चढून हा काही प्रश्न मिटणार नाही म्हणून तो आपले चुलत्याकडे हा वाद मिटवा म्हणून गेला होता. त्यावेळी चुलत्याच्या मुलग्याने न्यासला तु काय मोठा लागून गेला आहेस का? तुझ्या बापाला सांग जा. तुम्हीच आमची जमीन हडपला आहेस यावर तो गप्प बसला. काही दिवस असेच गेले. त्याने आपल्या आई वडिलांना हा प्रकार सांगितलेला नव्हता. त्यामुळे त्याने ही गोष्टी कुणाला काही सांगितली नव्हती. कुठून तरी त्याच्या आई वडिलांनी ही गोष्ट समजल्यावर त्यांनी त्याला तू घराच्या भानगडीत पडू नकोस तुझे करियर आणि शिक्षण बघ असा त्याला सल्ला दिला त्यानंतर त्यांनी आपल्या भावाला तु माझ्या मुलाला का दम दिलास? याचा जाब विचारायला गेल्यावर त्याच्या भावाने त्याच्या मुलाने शिवाजी खरात याच्या बरोबर भांडण काढून त्यांना मारहाण केली होती.आता तर हा वाद चिघळला होता. त्याला ही बरीच महिने झाली होती. तरी ही दोन्ही कुंटूंबात अधून मधून धुसफुस चालूच होती. न्यासचा चुलत भाऊ तर न्यासवर डुख धरूनच होता. वाटेत कुठे ही भेटले तर ते दोघे ही एकमेकांकडे खुन्नशी नजरेने पाहत होते. एकमेकाला बघून घेण्याची भाषा करीत होते. ते दोघे ही तसे अल्पवयीन होते. अलिकडे न्यास हा आपल्या करियरकडे लक्ष देत होता. तो शिक्षणाबरोबर पोलीस आणि लष्करी भरतीसाठी प्रयत्न करीत असल्याने त्याच्या चुलत भावाला बघवत ही नव्हते. हा जर पुढे गेला तर उदया आपल्याला डोईजड झाल्या शिवाय राहणार नाही याचा त्याने विचार केला न्यासही त्याच्या वडिलाप्रमाणेच वागणार याची त्याला खात्री झाली होती. याला काही ही करून पुढे जाऊ दयायचे नाही जमीनीच्या वादात हा पुढे पुढे करतो म्हणून त्यालाच कायमचा धडा शिकवला पाहिजे असा त्याने विचार केला आणि तो विचार त्याने अंमलात आणण्यासाठी त्याने आपल्या दुसऱ्या एका अल्पवयीन मित्राची मदत घेण्याचे ठरविले.त्याचा तो अल्पवयीन मित्र ही त्याला या कामात मदत करण्याचे ठरविले. बुधवार दि.२८ डिसेंबर रोजी दुपारी तो कामानिमित्य घरातून बाहेर पडला.संध्याकाळ झाली रात्र झाली तरी तो घराकडे काही परत आला नाही म्हणून त्याचे आई वडिल काळजी करीत होते.रात्री उशिरापर्यत त्यांनी त्याची वाट बघून त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. सिध्दनाथवाडी आणि जवळपासच्या परिसरात त्याचा शोध घेतला तरी त्याचा शोध काही लागत नव्हता.म्हणून त्याच्या वडिलांनी वाई पोलीस स्टेशन गाठून आपला मुलगा न्यास शिवाजी खरात (वय १७) हा बुधवार दुपार पासून बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. ही तक्रार दाखल झाल्यावर पोलीस ही त्याचा शोध घेत होते. गुरूवार सकाळी पोलीसांना धोम धरणाच्या कालव्यालगतच्या एका शेतात झाडाझुडूपात त्याचा मृतदेह छिन्नविच्छन्न अवस्थेत मिळून आला. त्याचे हात पाय धडा पासून वेगळे करून तोडले होते तर त्याच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या खुणा ही दिसत होत्या. एवढया निर्दयीपणे त्याचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा तपास पोलीस करीत होते. पोलीसांनी घटनास्थळाचा आणि घटनेचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी वाई येथील शासकीय रुग्णायलयात पाठवून दिला. पोलीसांनी याघटनेची माहिती पोलीसांनी मयत न्यास याचे वडिल शिवाजी खरात याचेकडून घेतली. आपल्या वडिलार्जीत जमीनीचा वाद आपल्या चुलत भावाबरोबर असून त्याचेबरोबर आपले आणि आपल्या कुंटुबियांची बऱ्याचवेळेला भांडणे झाली आहेत. चलुत भावाच्या मुलाने माझ्या मुलाला मागे एकदा धमकी दिलेली होती अशी माहिती त्यांनी पोलीसांना दिली. पोलीसांनी घटनास्थळी श्वान पथकाला आणि ठेस तज्ञांना पाचारण केले. श्वान ही थोडयाचा अंतरावर जावून घुटमळे होते. मयत न्यास याचे मोबाईल कॉलचे कॉल पोलीसांनी तपासले असता त्याच्या मोबाईलवर त्याच्या चुलत भावाचा फोन आल्याचे दिसून आले. यावरून पोलीसांनी या घटनेतील त्याचा चुलत भावाचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्याचेकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने पोलीसांना सांगितले की, मयत न्यासच्या वडिलाच्या बरोबर आमच्या घराच्याचा जमीनीचा वाद सुरू असून त्या वादात न्यास हा पुढे पुढे करत होता. त्याने आम्हाला धमकी दिली होती. या वादातून बुधवार दि.२८ रोजी तो बाहेर गेला असताना रात्री त्याला मी व माझ्या एका मित्राने गाठून त्याचवेर धारदार शस्त्राने छातीवर मानेवर आणि गळ्यावर धारदार शस्त्राने वार केले. त्या वारात त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाल्याने मी व माझा मित्र घाबरलो. आता त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याचा आम्ही विचार करीत असताना माझ्या मित्राने घरातून कोयता आणला. त्या कोयत्याने आम्ही त्याचे हात पाय तोडले.आम्ही दोघांनी त्याचा मृतदेह दुचाकी गाडीवर ठेवला आणि धोम धरणाच्या कालव्या लगताच्या एका शेतातील झाडाझुडपात नेऊन टाकला आणि तेथून पलायन केले. त्याने दिलेल्या या माहितीवरून पोलीसांनी त्याच्या मित्राला ही पोलीसांनी ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा केला. मयत न्यास याचे वडिल शिवाजी खरात यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार पोलीसांनी न्यास शिवाजी खरात (वय १७)याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी त्याचा चुलत अल्पवयीन भाऊ व त्याचा अल्पवयीन मित्र या दोघांच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना वाई येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बालसुधारगृहात केली.या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक समीर शेख, पोलीस उपाधिक्षक डॉ.शितल जानवे-खराडे,पो. निरी.बाळासाहेब भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी.रविंद्र तेलतुंबडे, उपनिरीक्षक स्नेहल सोमदे, डीबीचे पोलीस विजय शिर्के, किरण निबांळकर, श्रावण राठोड, सोनाली माने, प्रसाद दुदस्कर, उमेश गहीन, अजित जाधव यांनी केला. घर शेत जमीनीचा वाद हा वेळेत मिटविला गेला नाही तर त्याचे परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## पैसे कमवण्याचा एक नवीनच ...

घरच्या लोकांनी वर्षा जाधव यांना त्यांनी मागितलेली रक्कम व मुलीच्या घरच्या लोकांना पैसे देतो असे सांगितले.त्यावर वर्षा जाधव यांनी पुणे विश्रांतीवाडी येथील सिध्देश्वर वाघमारे यांची कन्या अर्चना वाघमारे हिचे स्थळ दाखविले. अर्चना ही दिसायला देखणी सुंदर असल्याने बघताच क्षणी विकास आणि त्याच्या घरच्या लोकांनी तिला पसंत केले.वधु वरांची पंसती झाल्यावर लग्नाची बोलणी सुरू झाली अर्चना हिच्या आई वडिलांची परिस्थीती नसल्याने मोगणे कुंटुबियांनी नववधुला सोन्याचे मणीमंगळसुत्र, चांदीचे पैंजण व जोडवी आदि आपल्या ऐपतीप्रमाणे घातले. लग्नाचा खर्च ही त्यांनीच केला.ठरल्याप्रमाणे लग्न गेल्यावर्षी ऑक्टोंबर २०२१ला झाल. त्यावेळी त्यांनी लग्न जमविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या वर्षा जाधव यांना १ लाख ६० हजार रूपये उचलून दिले. हे लग्न जमविण्यासाठी वर्षा जाधव यांच्या बरोबर तिचा नवरा जगदीश जाधव यांनी ही प्रयत्न केला होता. त्यामध्ये आणखी दोघांचा सहभाग होता. ही रक्कम ते तिघांत वाटून घेणार होते. शिवाय यातील काही रक्कम वर्षा जाधव ही मुलीची आई रेखा वाघमारे आणि वडिल सिध्देश्वर वाघमारे यांना देणार होती.त्यामुळे तिने हे लग्न जमविण्यासाठी एवढी मोठी रक्कम मोगणे यांच्याकडून घेतली होती. गेल्यावर्षी पुण्यात थाटामाटात अर्चना आणि विकास याचे लग्न पार पडले.लग्नानंतर अर्चना ही पाच दिवस कुरूंदवाड ये्थे येऊन राहून गेली. त्यानंतर ती परत काही कुरूंदवाड येथे आली नाही. सुरूवातील काही तरी कारण सांगून ती येण्याचे टाळत होती. हा प्रकार असाच पाच सात माहिने चालू होता. विकास तर अर्चनाला भेटण्यासाठी तडफडत होता.पण ती त्याला ही भेटत नव्हती. तो किंवा त्याच्या घरचे लोक तिला पुण्याला आणायला गेले की अर्चनाचे घरचे लोक त्याच्याबरोबर भांडण काढत होते.तुम्ही आम्हाला फसविले आहे. नवरा मुलगा आम्हाला पसंत नव्हता. असे उलट सांगून आम्ही मुलीला तुमच्याकडे पाठवत नाही असे सांगितले.यावर विकास आणि त्याच्या घरच्या लोकांनी लग्न जमविणाऱ्या वर्षा जाधव यांच्याशी संपर्क साधला असता वर्षा जाधव यांनी मोगणे यांना मी लग्न जमविण्याचे काम करते, लग्नानंतर जे काही घडते त्याला मी जबाबदार राहत नाही असे सांगत त्यांना घरचा रस्ता दाखविला. लग्न होऊन वर्ष झाले तरी अर्चना ही नांदायला येत नाही शिवाय तिच्या घरचे लोक ही दाद देत नाहीत म्हटल्यावर विकास मोगणे व त्याच्या आई वडिलांना आपली फसगत झाली आहे याची खात्री झाली. लग्न करून ही काही फायदा झाला नाही शिवाय दोन तीन लाखाला टोपी बसली ती वेगळीच त्यामुळे विकास याने अर्चना हिची वाट पाहून कुरूंदवाड पोलीस ठाण्यात अर्चना व तिचे आई वडिल आणि लग्नात मध्यस्थी करणारे वर्षा जाधव आणि जगदीश जाधव याच्या विरोधात तक्रार दाखल केली. दुसऱ्या एका घटनेत कुरूंदवाड येथीलच अविनाश घारे याचे ही लग्न वर्षा जाधव हिने जमवून आणले. विकास याच्या माध्यमातूनच वर्षा जाधव याच्याशी अविनाश घारे याची ओळख झाली होती. त्याचे ही लग्न जमता जमत नव्हते. त्याच्या लग्नाची सुपारी वर्षा जाधव यांनी घेतल्यावर पुणे हडपसर येथील ज्ञानबा रामचंद्र दवंड याची मुलगी शारदा दवंड याच्याशी त्यांनी जमविले. गेल्या महिन्यात त्यांनी हे लग्न जमवून आणले या कामी वर्षा जाधव यांनी अविनाश घारे आणि त्याच्या आई वडिलाकडून १ लाख ८०हजार रूपये व मुलीला मणीमंगळसुत्र अडीच तोळयाचे दागिणे घालायला लावले.ते लग्न ही थाटामाटात पार पडले.नववधु शारदा ही पाच दिवस कुरूंदवाड येथे नांदायला आली. पाच दिवसांनी ती अंगावरील सोन्या चांदीच्या दागिण्यासह जी गेली ती परत आलीच नाही. अविनाश याने याबाबत वर्षा जाधव याच्याकडे चौकशी केली असता तिने आपला हात वर करीत यात माझा काही दोष नाही मी पैसे घेऊन लग्न जमविते.त्यांनतर तुमचे तुम्ही बघायचे असते असा सल्ला दिला त्यांनतर अविनाश याने पुण्याला जावून शारदाच्या आई वडिलाकडे चौकशी केली त्यावेळी त्यांनी मुलीला तुमच्याकडे आम्ही पाठवून देत नाही असे स्पष्टच अविनाश घारे यांना सांगितले. आपली जवळपास २लाख ८० हजारांची फसवणुक झाली असल्याचे त्याच्या लक्षात येताच त्याने ही कुरूंदवाड पोलीस स्टेशन गाठून याबाबतची तक्रार दाखल केली. लग्न जमविताना एकाच व्यक्तीकडून दोघांची फसवणुक झाल्याचे पोलीसांच्या लक्षात येताच पोलीस ही सतर्क झाले. लग्न जमवून फसवरुक करणारी टोळी याकामी कार्यरत आहे का याचा तपास पोलीस करीत आहेत.अविनाश घारे याने दिलेल्या फिर्यादीत नववधु शारदा ज्ञानबा दवंड तिचे वडिल ज्ञानबा रामचंद्र दवंड दोघे रा.हडपसर हवेली पुणे,एंजट वर्षा जाधव रा.सुलतानगोदे ता.खानापूर जिल्हा सांगली, संध्या सुपणेकर, रा.माळवाडी, ता.पलूस जि.सांगली याच्या विरोधात तक्रार दाखल केली. तर विकास मोगणे यांनी एंजट वर्षा जाधव तिचे पती जगदीश बंजरग जाधव रा.दोघे ही सुलतानगोदे ता.खानापुर जिल्हा सांगली, सतोंष ज्ञानदेव सुतार रा.मदनवाडी ता.इंदापूर नववधु अर्चना सिध्देश्वर वाघमारे, तिची आई श्रीमती रेखा वाघमारे, रा.दोघी आदर्शनगर, गणपती मंदिरजवळ, विश्रांतीवाडी पुणे आणि सुवर्णा अमोल बागल रा.भोसरी पुणे याच्या विरोधात तक्रार दाखल केली. या सर्वाच्या विरोधात तक्रार दाखल झाल्यावर पोलीस त्याचा शोध कुरूंदवाड पोलीसांनी पुणे येथे जावून घेतला. या घटनेतील नववधु शारदा दवंड तिचे वडिल ज्ञानबा दवंड आणि अर्चना वाघमारे तिची आई रेखा वाघमारे यांना ताब्यात घेऊन कुरूंदवाड पोलीस स्टेशनला आणून त्यचोकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी ही या घटनेची परस्पर विरोधी तक्रार दाखल केली.एजंट वर्षा जाधव आणि त्याच्या इतर साथीदारांचा शोध पोलीस घेत होते. दोन्ही घटना या एकसारख्याच आणि एकाच व्यक्तीकडून जाणीवपूर्वक घडवून आणल्याचे दिसून येते. वर्षा जाधव हिने पैसे घेऊन दोघांना ही खोटया लग्नाच्या जाळ्यात अडकविले. तिचा तो धंदाच बनला होता. लग्न न जमणाऱ्या तरूणांना हेरून त्यांना मुली दाखवायच्या त्याच्याबरोबर काही काळापुरते लग्न लावून दयायचे नंतर तिच्याच सांगण्यावरून त्या मुलींनी तेथून पळ काढायचा. हे एजंटकडून गुपचुपपणे ठरलेलेच असते. त्याचा तो धंदाच असतो म्हणूनच लग्न जमविताना थोडीफार काळजी घेतली की होणारी फसवणूक टाळता येते. नाहीतर गुडघ्याला बाशिंग आणि दाराला तोरण अशीच गत होते.

# महिलेच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या डॉक्टरचा जामीन रद्द






**लातूर/प्रतिनिधी**

कोरोनाच्या संकट काळात रुग्णांना मदत करण्याऐवजी अनेक ठिकाणी डॉक्टर लोकांनीच रुग्णांच्या नातेवाईकांना लुबाडले. तर काही डॉक्टरांनी चक्क बनवत औषधे देऊन रुग्णांचा जीव घेतला. उदगीर येथे अशीच एक घटना २०२१ मध्ये घडली होती. येथील उदयगिरी रुग्णालयात महेश जेवणे यांच्या कोरोन बाधित मातोश्रींना बोगस रेमडेसीव्हर इंजेक्शन देण्यात आले होते. त्यात जीवने यांच्या आईचा मृत्यू झाला होता. या घटनेची सविस्तर बातमी क्राईम संध्या वृत्तपत्राने छापली होती. त्यामुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात खळबळ माजली होती. दरम्यान या प्रकरणी जीवने यांनी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात डॉ. माधव चंबूळे आणि डॉ. नामदेव गिरी यांच्या विरुद्ध फिर्याद दाखल केली होती. या प्रकरणी उदगीर पोलीस ठाण्यात दोन्ही डॉक्टरांच्या विरुद्ध २७९/२०२१ कलम ४२०,२७४,२७५,२७६, आणि ३४ तसेच कॉस्मेटिक आणि ड्रग कायद १९४० कलम ९बी, १८सी ,१७ बी आणि २७ अन्वये गुन्हा दाखल केला. मात्र या गुन्ह्यात पोलिसांनी कलम ४१ए खाली जमीन मंजूर केला. पण पोलिसांना असा जमीन देता येत नाही असे जीवने यांचे म्हणणे होते तसेच पोलिसांकडून तपासही व्यवस्थित होत नव्हता म्हणून त्यांनी या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयाच्या निर्देशने एलसीबीकडे ट्रान्स्फर केले. पुढे एलसीबी अधिकारी एपीआय आर.डी. भवरे यांनी तपास करून या प्रकरणी जेएमएफसी न्यायालयात आरोपींच्या विरुद्ध आरोपपत्र दाखल केले. तत्पूर्वी डॉ. नामदेव गिरी यांचे निधन झाले होते. मात्र सुनावणी दरम्यान डॉ.माधव चंबुले यांनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला, तो न्यायालयाने मंजूर केला आणि १५,००० च्या वैयक्तिक बॉन्डवर जमीन मंजूर केला. मात्र हा जमीन मंजूर करताना आवश्यक तो रीजन देण्यात आला नव्हता आणि मुख्य म्हणजे अशा केसमध्ये आरोपींना जामीन देण्याचा अधिकार जेएमएफसी न्यायालयाला नाही अशा काही मुद्यांसह डॉक्टरांच्या जामिनाला जीवने यांनी हरकत घेतली आणि या प्रकरणी सत्र न्यायालयात अपील केले. त्यानंतर सत्र न्यायालयात सुनावणी होऊन न्यायालयाने जामीन रद्द केला आणि २३ जानेवारीपर्यंत आरोपींना आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत. जीवने यांच्या या पाठपुराव्यामुळे त्यांच्या दिवंगत मातोश्रींना मृत्यू नंतर का होईना न्याय मिळणार आहे.

# आबिटघर येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

बांधकाम आणि आरोग्य समिती सभापती जिल्हा परिषद पालघर, संदेश ढोणे यांनी आबिटघर कांबारे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व कर्मचारी निवासी इमारतीसाठी प्रस्तावित असलेल्या जागेची आज पाहणी केली. वाडा तालुक्यातील आबिटघर कांबारे हा ग्रामीण भाग असून येथे औद्योगिक वसाहत देखील मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे या भागातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आबिटघर येथे उपकेंद्र आहे परंतु या गावाची लोकसंख्या विचारात घेता प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरात लवकर होणे गरजेचे आहे या हेतूने आरोग्य समिती सभापती संदेश ढोणे यांनी प्रस्तावित असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीची व कर्मचारी निवासस्थानाच्या जागेची पाहणी केली. १७ जानेवारी २०१३ साली ही इमारत मंजूर झाली असून सदरची जागा जमीन मालक देण्यास तयार आहे, परंतु अद्याप ही जागा जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या नावावर वर्ग करण्यात आली नसून या प्रक्रिये बाबतची सविस्तर चर्चा यावेळी करण्यात आली. तसेच संबंधितांना मार्गदर्शन पर सूचना यावेळी सभापती ढोणे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी आबिटघर उपकेंद्राची पाहणी केली असता दरमहा चार ते पाच प्रसूती या उपकेंद्रात होत असतात.याबद्दल तेथील परिचारिका, मदतनीस व इतर कर्मचारी यांचे कौतूक सभापती ढोणे यांनी केले. परंतु भागातील गरोदर माता तसेच रुग्णांना उपचारासाठी खानिवली प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा वाडा ग्रामीण रुग्णालय येथे जावे लागते तसेच दळणवळणाच्या दृष्टीने गैरसोय होत असल्याने अनेकदा खाजगी रुग्णालयाचा आधार घ्यावा लागतो. जे ग्रामीण भागातील गरीब जनतेला परवडणारे नाही त्यामुळे लवकरात लवकर आबिटघर प्राथमिक आरोग्य केंद्र तयार होणे गरजेचे असून येथील जनतेचा आरोग्याचा मूळ प्रश्न सुटेल असे प्रतिपादन संदेश ढोणे यांनी यावेळी केले. यादरम्यान जिल्हा परिषद सदस्य भक्ती वलटे, उपसभापती वाडा पंचायत समिती जगदीश पाटील, ग्रा.पं. सदस्य भरत जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य दिव्या मस्कर, तालुका आरोग्य अधिकारी वाडा डॉ. मिलिंद चव्हाण व इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# देवणीत विश्ववाणी चर्चमध्ये विविध उपक्रमांनी येशूंचा जन्मोत्सव साजरा



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरातील फुलेनगर येथील विश्ववाणी चर्चमध्ये रविवार रोजी येशूं ख्रिस्त यांचा जन्मोत्सव विविध उपक्रम राबवून प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. मानवजातीच्या कल्याणासाठी पृथ्वीतलावर अवतरलेल्या प्रभू येशूंचा जन्मोत्सव अर्थात ख्रिसमसचा सण देवणी शहरातील फुलेनगर येथील विश्ववाणी चर्चमध्ये विविध धार्मिक पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. चर्चमध्ये सकाळी सामुहिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चर्चच्या सदस्यांनी विविध नाताळ गितांमधून प्रभू येशुंच्या जन्माचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत प्रभू येशू ख्रिस्त यांच्या जन्मोत्सव कार्यक्रमात केक कापूस आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी रेव्ह वसंत भोसले, देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे, बाबुराव लांडगे, प्रा, अनिल इंगोले, ॲड राजकुमार मोहिते, रमेश सुर्यवंशी, शिवाभाऊ कांबळे, अमरदिप बोरे, पत्रकार जितेश रणदिवे, लक्ष्मण रणदिवे, जयेश ढगे, सिकंदर गायकवाड, सचिन भोसले, शामला वाडेकर, मिना भोसले, सुलाबाई कांबळे, शकुंतला कांबळे, रुक्मिणी कलवले, कमल रणदिवे, ज्योती कांबळे, प्रिया कसबे, सुनील सुर्यवंशी, मारोती गायकवाड, प्रकाश मोहिते गोरख थोरे, यांच्यासह आदी येशू ख्रिस्त यांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुषमान कार्ड धारकांना ५ लाखापर्यंत मोफत उपचार

**पालघर** : पालघर जिल्ह्यातील गोरगरीब कुटुंबाना विविध गंभीर आजारांवार उपचारासाठी कोणताही मोठा आर्थिक दंड बसू नये यासाठी महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना राबविल्या जात आहेत. या योजनेअंतर्गत पालघर जिल्ह्यात १८ रुग्णालये आहेत. योजनेच्या माध्यमातून ५ लाख पर्यंत आयुषमान कार्ड धारकांना गंभीर आजार व शस्त्रक्रिया उपचारासाठी सरकारकडून अर्थसाहाय्य दिले जाते. जवळपास १ हजार २०९ आजारांवार शस्त्रक्रिया तसेच उपचारांसाठी लाभ मिळतो. योजनेत समाविष्ट १८ रुग्णालये पुढील प्रमाणे आहेत. ग्रामीण रुग्णालय पालघर, ग्रामीण रुग्णालय वाडा, पतंगशाह कुटीर रुग्णालय जव्हार, उपजिल्हा रुग्णालय कासा, उपजिल्हा रुग्णालय डहाणू, अधिकारी लाईफ लाईन रुग्णालय नागझरी बोईसर, आस्था रुग्णालय मनोर, दयानंद रुग्णालय तलासरी, डॉ. एम एल ढवळे रुग्णालय पालघर, जनसेवा रुग्णालय वसई, जीवदानी (अलायन्स) रुग्णालय नालासोपारा, स्वामी श्रद्धानंद रुग्णालय वसई, संजीवनी रुग्णालय विरार, स्टार रुग्णालय नालासोपारा, विजयालक्ष्मी रुग्णालय नालासोपारा, श्री भगवान महादेव सांबरे रुग्णालय झडापोली विक्रमगड, सेंट मदर टेरेसा रुग्णालय विरार, लाईफ लाईन रुग्णालय नालासोपारा. पालघर जिल्ह्यातील ३८१४४५ नागरिकांना आयुषमान कार्ड (गोल्डन कार्ड) चे वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यात आयुषमान भारत गोल्डन कार्ड काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. पात्र लाभधारकांची गावनिहाय यादी https://aapkedwarayushman.pmjay.gov.in/-apkeDwar/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी पात्र लाभधारकांनी नजीकच्या ग्रामपंचायत कार्यालयातील केंद्र चालक, सी एस सी सेंटर किंवा योजनेतील समाविष्ट १८ रुग्णालयात जाऊन नोंदणी करून आयुषमान कार्ड काढून घ्यावे.

# पावणेदोन लाखांच्या गोवा दारूसह दोन वाहने जप्त




**सोलापूर/प्रतिनिधी**

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारू विरोधात मोहीम राबविण्यात येत असून सांगोल्याच्या पथकाने एका मारुती ८०० कारमधून ७ पेट्या देशीदारू तर सोलापूरच्या पथकाने उत्तर सोलापूर तालुक्यात इंडिगो कारमधून २५ पेट्या गोवा बनावटीची विदेशी दारूत जप्त केली आहे. निरीक्षक सदानंद मस्करे यांनी त्यांच्या पथकासह गुरुवारी रात्री एक वाजता उत्तर सोलापूर तालुक्यातील गावडीदारफळ ते काटी रोडवर सापळा रचून एका टाटा इंडिगो (एमएच १२ सीडी ४५७२) मधून गोवा बनावटीचे इम्पेरियल ब्ल्यू व्हिस्की विदेशी दारूच्या १८० मिलीच्या १२०० सीलबंद बाटल्या जप्त केल्या आहेत. या गुन्ह्यात १ लाख ८० हजारांची दारू जप्त केली असून आरोपी परमेश्वर शहाजी बदाले व संदीप फुलचंद पवार यांना अटक करण्यात आली. या गुन्ह्यात एकूण साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच सांगोल्याचे दुय्यम निरीक्षक कैलास छत्रे यांनी जवान तानाजी काळे यांच्यासह सांगोला तालुक्यातील एकतपुर हद्दीत मारुती कार (एमएच १२ एन १७३६) मधून देशीदारू स्पेशल संत्रा ब्रॅंडच्या १८० मिली च्या ३३६ सीलबंद बाटल्या जप्त केल्या. यात २३ हजार ५२० रुपये किमतीचे दारू जप्त केली असून अब्दुल हिरालाल शेख याला अटक केली. भरारी पथकाने जुना कुंभारी नाक्यावरील जय अंबिका बिर्याणी हाऊसवर धाड टाकून हॉटेल चालक पांडुरंग अर्जुन सामल व त्या ठिकाणी दारू पीत बसलेले ग्राहक नितीन अर्जुन सामल, विशाल अंबादास कंकुर्ती व आकाश अंबादास मंजूळकर या तीन मद्यपीना अटक केली अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायदंडाधिकारी डी आर भोला यांनी धाबा चालकाला प्रत्येकी २५००० व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी २००० असा एकूण ३१ हजारांचा दंड ठोठावला आहे. सरकार तर्फे वकील संतोष पाटील यांनी न्यायालयात बाजू मांडली. ही सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्क चे अधीक्षक नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# दाखले मार्गदर्शन शिबीरास नागरिकांचा प्रतिसाद



**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) वाडा शहर शाखेच्या वतीने विद्यार्थी तसेच नागरिकांना आवश्यक असणारे दाखले, प्रमाण पत्रांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वाडा पंचायत समितीच्या पाठीमागे शिवसेना वाडा तालुका समन्वयक प्रकाश केणे यांच्या निवास स्थानी शिबिराचे आयोजन करत आले होते. संजय गांधी निराधार योजना पॅन कार्ड , महात्मा फुले जनआरोग्य योजना श्रावणबाळ सेवानिवृत्ती योजना राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना व्यक्तिगत दाखले आयुष्यमान भारत योजना ई श्रम दाखला एस. टी. हाफ तिकिट व फ्री प्रवासी दाखला अशा विविध योजनांचे फॉर्म भरून देणे व मार्गदर्शन यावेळी नागरिकांना करण्यात आले. दि. २६,२७ व २८ डिसेंबर अशा तीन दिवसाच्या शिबिराचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला असल्याची माहिती वाडा तालुका समन्वयक प्रकाश केणे यांनी सांगितले. शिबिराच्या उदघाटन प्रसंगी निलेश गंधे, तुषार यादव, निलेश पाटील, प्रमोद घोलप, प्रणय गंधे, प्रकाश केणे, गीतांजली कोलेकर, प्रसाद गंधे, वर्षा गोळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालघर जिल्ह्यात जनसंवाद अभियानाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद; चार वर्षाची हरवलेली मुलगी सापडली




**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्हाचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी जिल्हा भरात राबवलेल्या जनसंवाद अभियानाला नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत असून सर्वसामान्य नागरिक थेट पोलिसांशी संपर्क करून सहकार्य करत आहेत, यांचेच एक उदाहरण शुक्रवारी एक चार वर्षाची हरवलेली मुलगी सामान्य नागरिकाच्या सतर्कतेमुळे सुखरूप सापडली आहे. वाडा तालुक्यातील चिंचघर येथील गणपती मंदिरा समोर खेळत असलेली मुलगी घरी न आल्याने तिचा शोध घेतला असता ती कुठेच मिळून आली नाही. जिकराईल पठान यांची मुलगी समीरा पठान ही चार वर्षाची मुलगी गणपती मंदिर परिसरातून शुक्रवारी सकाळी बेपत्ता झाली होती. ही बाब आई वडिलांच्या लक्षात आल्या नंतर त्यांनी कुडूस पोलीस दुरक्षेत्रचे अधिकारी संतोष वाघचौरे यांच्या संपर्क केला. तिचा फोटो व माहिती समाज माध्यमांवर शेअर करून सर्वत्र सिद्ध सुरु झाला. संध्यकाळ पर्यत तिचा शोध लागला नाही, शेवटी गुन्हा नोंद करत असताना एका नागरिकाने पोलीस उपनिरीक्षक वाघाचौरे यांना फोन करून एक मुलगी सापडली असल्याचे सांगितले. तेंव्हा पोलीस त्या ठिकाणी तत्काल पोहचले व शहानिशा केली. सकाळपासून जिचा शोध घेतला जात होता ती हिच मुलगी असल्याचे निष्पन्न झाले. दामोदर लाड यांना ती मुलगी रस्त्यावर रडत फिरत असलेली आढळून आल्याने त्यांनी पोलिसांना फोन करून माहिती दिली यावेळी लाड यांनी सांगितले की पोलिसांच्या जनसंवाद अभियानाच्या निमित्ताने पोलिसांचा मोबाईल क्रमांक मिळाला होता म्हणून पोलिसांना फोन करून माहिती देऊ शकलो. समीरा पठान हिच्या पालकांना बोलावून घेऊन मुलीला सुखरूप सुपूर्द केले तर पोलिसांना सहकार्य करणाऱ्या दामोदर लाड यांचा पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी सत्कार, सन्मान केला.

# जिल्हा परिषद उपाध्यक्ष पंकज कोरे यांची वाडा पंचायत समितीला धावती भेट



**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पंकज कोरे यांनी गुरुवारी वाडा पंचायत समिती कार्यालयाला अचानक भेट दिली. येथील कामकाजाचा आढावा घेऊन अधिकाऱ्यांना धारेवर धरले, तसेच शिक्षण वीभागात असणाऱ्या समस्या जाणून घेतल्या तर डिजिटल शाळा बद्दल माहिती घेतली असता अजूनही त्यामध्ये जास्तीतजास्त सुधारणा करणे आवश्यक असल्याचे सांगितले. मुलांच्या शिक्षणात अधिका अधिक सुधारणा होणे गरजेचे असल्याचे सांगितले, यावेळी उपाध्यक्ष यांनी जिल्हा शिक्षण अधिकारी भागवत मॅडम याना जातीने लक्ष देण्यास सांगितले. विद्यार्थ्यांचे खेळाचे क्रीडांगण कसे आकर्षित होईल व सर्वोत्तम खेळाडू आपल्या जिल्याचे नाव महाराष्ट्र कसे उज्वल करतील याकडे लक्ष देण्यास सांगितले, यावेळी उपाध्यक्ष यांनी वाडा तालुक्यातील नेहरोली, खुपरी, नारे या शाळांना भेटी दिल्या, खुपरी शाळेतील विध्यार्थी आणि शिक्षकांनी पोवाडा गाऊन उपाध्यक्ष यांचे स्वागत केले, याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वरमधील चार खेळाडूंची राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड



**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील महात्मा बसवेश्वर कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील चार खेळाडूंची राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांत उटगे आणि सदस्य अशोक उपासे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, उपप्राचार्य बी.एम.जाधव, पर्यवेक्षक प्रा.शिवशरण हावळे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, मराठी विभाग प्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.विजयकुमार सोनी, हिंदी विभाग प्रमुख डॉ.मनोहर चपळे, प्रा.डी.आर.भुरे, डॉ. घन:श्याम ताडेवाड, प्रा.आशिष क्षीरसागर, नामदेव बेंदरगे आणि विष्णू तातपुरे आदीची उपस्थिती होती. जिल्हा क्रीडा कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय ज्युदो क्रीडा स्पर्धा गुरुगोविंद सिंग बॅडमिंटन हॉल येथे नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत ५५ किलो वजन गटात बाळासाहेब जमादार (प्रथम), ६७ किलो वजन गटात समाधान भोसले (प्रथम), ७१ किलो वजन गटात शंकर कतलाकुटे (प्रथम), १७ वर्ष वयोगट ५५ किलो वजन गटात अथर्व चव्हाण (प्रथम), १४ वर्षाखालील ५० किलो गटात श्रेयश शेळके व १७ वर्षाखालील ४५ किलो वजन गटात समाधान एडके यांचा द्वितीय क्रमांक आला आहे. या सर्व खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी केली म्हणून महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि खेळाडू यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

# मुक्तेश्वरच्या अनुराग सावंत यांची योगा स्पर्धेत राज्यस्तरावर निवड



**औसा/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद व जिल्हा क्रीडा परिषद उस्मानाबाद द्वारा आयोजित विभाग स्तर शालेय योगासन क्रीडा स्पर्धा सन २०२२-२३ तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयात मोठ्या उत्साहात पार पडल्या. त्यात औसा येथील मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सातवीतील ड मधील विद्यार्थी चि.अनुराग नेताजी सावंत यांनी १४ वर्षे वयोगटातून विभागातून प्रथम येऊन राज्यस्तरावर आपली निवड सिद्ध केलेली आहे. त्यांना योग प्रशिक्षक म्हणून त्यांचे क्रीडा शिक्षक श्री रड्डे बस्वराज, मंडले अंकूश, आशा झुंजे-पाटील, अजित ढोले व त्यांच्या पालकांचे मार्गदर्शन लाभले. अनुराग सावंत यांनी चित्त थरारक योगासने करून विभागातील सर्व स्पर्धकावर मात करून विभागातून प्रथम येण्याचा मान पटकावला व त्यांची राज्यस्तरावर निवड सिद्ध झालेली आहे. यामुळे मुक्तेश्वर शाळेच्या शिरोपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री शिवलिंगअप्पा औटी, सचिव श्री बस्वराज पटणे, संस्थेचे सर्वेसर्वा रविअप्पाराचट्टे, प्रभूअप्पा माशाळे संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक श्री जलसकरे शरणाप्पा, उपमुख्याध्यापक योगेश पकाले व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनीअनुराग सावंत यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस अनंत शुभेच्छा दिल्या आहेत.

पहिल्याच प्रयत्नात, लहान वयात योगा स्पर्धेत राज्यस्तरावर निवड झाल्याबद्दल सर्वत्र अनुराग सावंत यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# स्वागत नवं वर्षाचे आव्हान परतलेल्या कोरोनाचे!

सरत्या वर्षाचा कटू गोड आठवणींना मागे टाकून २०२३ या नव वर्षात पदार्पण करताना माणसाने निश्चितपणे स्वतःसाठी आपल्या कुटुंबासाठी काहीतरी संकल्प केले असतील, पण या वर्षात त्याची पूर्तता होईल की नाही याची मात्र काहीच शास्वती दिसत नाही. आणि त्याची कारणेही तशीच आहेत. माणसाचे जीवन दिवसेंदिवस खडतर आणि तितकेच आव्हानात्मक बनत चालले आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि या सर्वांना तोंड देत रोजच्या गरजा भागवताना पैशाची भासणारी चणचण! या सर्वांतून वाटचाल करताना माणसाची चांगलीच दमछाक होते आहे आणि असे असतानाही माणूस जगण्यासाठी रोजच्या रोज परिस्थितीशी संघर्ष करीत आहे मात्र हे सर्व प्रत्येक वर्षी तो अनुभवत असल्याने आता ही सगळी संकटे त्याच्या रोजच्या जीवनाचाच एक भाग बनली आहेत. या संकटाचा माणूस कसाही सामना करू शकतो, पण समोर आणखी एक भयानक संकट उभे आहे आणि ते म्हणजे कोरोनाचे संकट! कोरोनाची तीव्रता किती भयंकर असते ते माणसाने २०20 पासून तब्बल दीड वर्ष अनुभवली. भारतात जवळपास दीड कोटी लोकांना कोरोना झाला होता. त्यातील साडेचार लाख लोकांचा मृत्यू झाला. ज्यांचा कोरोनातून मृत्यू झाला ते सुटले. पण त्यांच्या कुटुंबाचे जे हाल, झाले त्याच्या आठवणीने सुद्धा अंगावर काटा येतो. कोरोनाच्या वेळी झालेल्या लोकडाऊनमुळे उद्योग धंदे बंद पडले. कोट्यवधी लोकांच्या नोकऱ्या गेल्याने ते बेरोजगार झाले. त्यामुळे कुटुंबावर उपासमारीची पाळी आली. पैसा अभावी मुलाबाळांचे शिक्षण बुडाले. जे लोक भाड्याने राहत होते त्यांना घरभाडे थकल्याने बेघर व्हावे लागले. कित्येकांनी आत्महत्या केल्या. त्यातच कोरोना काळात उपचाराच्या नावाखाली काही ठिकाणी डॉक्टर लोकांना लुबडत होते. त्यामुळे जगणे मुश्किल झाले होते. २०२१चा शेवटच्या टप्प्यात लसीकरण सुरू झालं आणि हळूहळू कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत गेला. तसे सरकारने कोरोना काळात लावलेले निर्बंध उठवले आणि २०२२ पासून जनजीवन पूर्वपदावर आले. कोरोनातून जे वाचले त्यांच्यासाठी उर्वरित आयुष्य हा एक प्रकारे बोनसच म्हणावा लागेल आणि म्हणूनच वर्षभराने पुन्हा कोरोना परतल्याने जगातील प्रत्येक माणूस भयभीत आहे. पुन्हा २०20 सारखी परिस्थिती येऊ नये यासाठी माणूस ईश्वराकडे प्रार्थना करतोय. कोरोनाची सर्वाधिक तीव्रता चीन, जपान, हॉन्कॉंग, अमेरिका यासारख्या देशांमध्ये आहे. पण भारततही कोरोनची तीव्रता वाढत चालली आहे. सध्या भारतात ५ हजाराहून अधिक कोरोनचे रुग्ण आहेत. विशेष म्हणजे ज्यांचे लसीकरण झाले आहे त्यांनाही कोरोनाने गाठले आहे. त्यामुळे २०२३ हे वर्ष कसे असेल हे सांगता येत नाही. बरे आपल्याकडे लोक सरकारचे ऐकत नाही. धार्मिक सण आणि उत्सव तसेच राजकीय कार्यक्रम, मोर्चे-आंदोलने यांना कुणी रोखू शकत नाही. कोरोना हा संसर्ग मधून होतो. त्यामुळे गर्दी टाळा असे वारंवार सांगूनही लोक ऐकायला तयार नाहीत, म्हणूनच भारतात चीन आणि जपान पेक्षा भयंकर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी धर्माच्या नावाखाली धार्मिक स्थळी होणारे सण-उत्सव आणि त्यासाठी होणारी गर्दी टाळण्यासाठी सक्तीच्या उपाययोजना करायला हव्यात. तरच २०२३ मध्ये आपण सुरक्षित राहू शकतो आणि सुरक्षित राहिलो तरच स्वतःसाठी कुटुंबासाठी नवे संकल्प करू शकतो. त्यामुळे २०२३ मध्ये कोरोनाचे सर्वात मोठे आव्हान आहे. भारतासमोर दुसरे मोठे आव्हान आहे. धार्मिक कट्टर पंथीय लोकांचे. कारण भारतात हिंदुत्वाच्या नावाखाली दलीत अल्पसंख्यांक लोकांना त्रास दिला जात आहे. त्यामुळे मुस्लिम तरुणांच्या मनात असंतोषाची भावना आहे. आपण या देशात सुरक्षित नाही ही भावना त्यांना आतंकवादाच्या आणि जिहादच्या मार्गावर नेते आहे. त्यामुळे देश आणखी एका फाळणीच्या उंबरठ्यावर आहे. भारतात धार्मिक स्वातंत्र्य आहे, पण त्याचा असा अर्थ नाही की बहुसंख्यांक समाजाने अल्पसंख्याक समाजाला त्याच्या धार्मिक क्टिव्हीवर हल्ले करणे. त्यांच्या संस्कृतीच्या खुणा पुसून टाकणे हे कुठे तरी थांबायला हवे. त्यासाठी सरकारने पुढाकार घ्यायला हवा. पण सरकार हेतुपुरससर अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करीत आहे. प्रेमात वाद आणि त्यातून होणारे ब्रेकअप तसेच या ब्रेकअप नंतरच्या हिंसक घटना या केवळ हिंदू मुली आणि मुस्लिम मुलगा यांच्यातच होतात असे नाही, तर हिंदू समाजातील एकच जातीच्या प्रेमी युगलामध्ये सुद्धा अशा घटना घडलेल्या आहेत आणि त्यातून प्रियकराने प्रेयसीचा जीव घेतलेला आहे, पण अशा घटनांची कुठे चर्चा झाली नाही. पण प्रियकर मुस्लिम असला आणि प्रेयसी हिंदू असली की त्याला लव्ह जिहादचे स्वरूप दिले जाते. हा प्रकार संतापजनक आणि हेतू पुरस्कर केला जात असल्याचे मुस्लिम समाजाचे म्हणणे आहे आणि त्यातून मुस्लिम समाजातील तरुण वर्ग प्रचंड नाराज आहे आणि त्याची हीच नाराजी त्याला जिहादी बनवतेय जे हे देशासाठी खूप घातक आहे. २०२३ मध्ये अशा घटना घडणार असतील तर परिस्थिती आणखी भयानक होईल!

# पांढऱ्या कपड्यातील संन्यासी!

तीर्थक्षेत्रापासून स्वार्थक्षेत्रापर्यंत... कलेपासून कलेवरापर्यंत... आणि संन्यासापासून पदन्यासापर्यंत जीवनातील प्रत्येक क्षेत्र आज गढूळ होताना दिसत आहे. सोबत हातात असलेला दिवा कोठे टांगावा नि हातातली काठी कोणत्या मातीत रोवून क्षणभर टेकावे, असा सवाल ठायी ठायी पडणाऱ्या ह्या जमान्यात कालच्या रोषणाईचा हिशोब मांडायचे दिवस आलेत,आणि अंधारालाच कंदिल उसना मागायचे दिवस आलेत. आजकाल पोटात ओरडणाऱ्या कावळयाचा धम्म ओळखता येत नाही, की तुकयाच्या अभंगातलं दुभंगणंही कळत नाही. आपल्या जगण्याच्या वाटेवर एखादा तरी तुळशीचा मळा भेटणार आहे की नाही? समाजातील एकाकी एकनाथांच्या हाका कोणाला ऐकूच येणार नाहीत काय ? सर्वत्र दुरितांचे तिमिर दाटलेले... माणसांच्या अमृतमय ओवीचे आकाशच फाटलेले पण नियतीने मांडलेल्या ह्या खेळात हरवत चाललेली जगण्याची गणितं शोधणारा, नवी जाणीव नि नवे भान निर्माण करणारा एक संवेदनशील भला माणूस, आज वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षाच्या उंबरठ्यावरही माणसा-माणसांना जोडणारा पूल बांधण्याची स्वप्नं बघतो आहे. ह्या भल्या माणसाचं नाव आहे : किशनराव पाटील इंचूरकर!



मूल्याधिष्ठित जगणे हा इंचूरकरांच्या आयुष्याचा मंत्रच असल्याने हा माणूस कधी उतला नाही. मातला नाही. समाजाच्या सेवेचा वसा त्यानं कधी टाकला नाही. त्यामुळेच जीवनाच्या बहुतेक क्षेत्रात हल्ली जी बकाली व मूल्यहीनता आलेली आहे, तिच्यापासून इंचूरकर स्वतःला दूर ठेवू शकले आहेत. १ जानेवारी १९४९ रोजी लातूर जिल्ह्यातील माने जवळगा येथे जन्म झालेल्या इंचूरकरांनी मॅट्रिक पर्यतचे शिक्षण उदगीरच्या शिवाजी हायस्कूलमध्ये घेतले. त्यानंतर ह्या ध्येयवेड्या माणसाने महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्याला वाहून घेतले. बापूसाहेब एकंबेकर, माधवराव वकील जवळगेकर, त्र्यंबकराव पाटील लखनगावकर, यशवंतराव सायगावकर, कर्नाटक विधानसभेचे माजी उपसभापती बापूसाहेब हुलसूरकर, बस्वकल्याणचे तुळशीराम आर्य, बाबुराव वकील गोरचिंचोलीकर, गोविंदराव वकील, भाटसांगवीकर, रामराव राठोड, नवनाथ वासरे, पंढरीनाथ टेलर अशा बिनीच्या कार्यकर्त्यांच्या समवेत इंचूरकरांनी कसलीही अपेक्षा न ठेवता महाराष्ट्र एकीकरण समितीचे काम अंगात आल्यासारखे केले. सध्या कर्नाटकातील भालकी येथे रहिवास असलेले किशनराव पाटील इंचूरकर हे तब्बल २६ वर्षे महात्मा गांधी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक उपाध्यक्ष म्हणून राहिले. समितीचे सभापतीपदही त्यांनी पाच वर्षे भूषविले. भालकीच्या कृषी उत्पन्न बाजार बिदर जिल्हा काँग्रेस सेवादलाचे ते दहा वर्षे अध्यक्ष होते. भालकी तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. कुळ कायदा समितीचे तालुका सदस्य अशी अनेक पदे भूषविणाऱ्या किशनराव पाटलांना आजही स्वतःचे घर नाही. मोटारगाडीच काय, साधी सायकलही नाही. भालकीला किरायाच्या घरात किशनराव राहतात. गावाकडे थोडीफार जमीन आणि स्वतःचा वाडा आहे, एवढेच. बाजार समितीत चेअरमन असताना त्यांनी केलेल्या कामाची आजही भालकी तालुक्यातील शेतकरी अत्यंत आदराने चर्चा करतात. जनावरांचा बाजार, उत्कृष्ट जनावरांना दोन-दोन लाखांची बक्षिसे, ग्रामीण भागात जनावरांच्या पाण्यासाठी बांधलेले १०० हौद, बाजार समितीचे नवीन १०० प्लॉटस्, पाण्याचे हौद, कृषि प्रदर्शने वगैरे सकारात्मक ठोस बाबी त्यांच्या कर्तृत्वाच्या साक्षीदारच आहेत.

१९९५ मध्ये किशनराव बीदर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले. बँकेच्या रौप्यमहोत्सवात त्यांचा तत्कालीन प्रधानमंत्री इंद्रकुमार गुजराल यांच्या हस्ते बीदर येथे सत्कारही करण्यात आला होता. गोरचिंचोली सोसायटीचे ते उपाध्यक्ष म्हणूनही आपल्या कामाचा ठसा उमटवून गेले. अलीकडेच त्यांचा लातूरला सप्तफेरे वधुवर सूचक मंडळाच्या वतीने केंद्रीय रसायनमंत्री भगवंत खुब्बा आणि लातूरचे माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीत सपत्निक जीवनगौरव पुरस्कार देवून सत्कार करण्यात आला होता, हे विशेष. मातोश्री चंद्रभागाबाई आणि पोलीस पाटील असलेले पिताजी विठ्ठलराव यांच्या पोटी जन्माला आलेल्या किशनरावांचा व्यवसाय शेती हाच राहिला. त्यांनी सात गावांना एकत्र करुन इंचूर येथे ग्रामपंचायत आणि पंचायत समितीचे केंद्र आणले. त्यांचे चिरंजीव व्यंकटराव यांना त्यांनी पाच वर्षे इंचूरचे बिनविरोध सरपंच केले. इ. स. २०१५ मध्ये बीदर जिल्हा स्वराज्य जन संस्थेचे ते अध्यक्ष होते. या सेवाभावी संस्थेच्या वतीने त्यांनी सार्वजनिक सेवाकार्य आरंभिले. भालकी येथील पुतळ्यांचे सुशोभिकरणही केले. माजी आमदार प्रकाश खंड्रे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी भालकी येथे महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी यांचे पुतळे बसविले. दिगंबरराव मानकरी, सायगावकर, स्वतः इंचूरकर, रामराव वरवटीकर, यादवराव कणसे, सिध्दलिंगप्पा काकनाळे, राचप्पा गोरठे आदि अनेक सहकाऱ्यांच्या समवेत काम करताना किशनराव पाटील इंचूरकर या नावाचा हा माणूस कधी थकला नाही. अत्यंत निगर्वी आणि नम्र व्यक्तिमत्व असलेल्या इंचूरकरांच्या डोळ्यात, गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाची चर्चा करताना, पाणी आलेले मी बघितले आहे. तीन कन्या, दोन मुले, चार बहिणी आणि एक भाऊ, नातू, पणतू असा सुखी संसार असलेले किशनराव फार समाधानी आहेत.

स्वार्थाचं वेड घेतलेली माणसं एकटी पडत असतात. पण समाजाचे डोळे पुसण्याचं वेड घेतलं की साथीला माणसं कमी पडत नाहीत. माणसांच्या भल्याचं किशनरावांचं हे वेड आजचं नाही, फार जुनं आहे ते. आपलं स्वतःचं जग उभं करण्याची ऊर्जा भालकीच्या मातीतून घेऊन किशनराव स्वतःचे वेगळे आकाश आजही शोधत आहेत. शेती व्यवसाय सांभाळून समाजकार्याची जोड देण्याचं सतीचं वाण त्यांनी घेतला आहे. तुकोबांची गाथा हेच किशनराव पाटील इंचूरकरांच्या जगण्याचं तत्वज्ञान आहे. समाजाच्या अश्रूंमध्ये आणि लोकांच्या वेदनांमध्ये आपल्या जगण्याचा अर्थ ते शोधत असतात. किशनराव पाटील नावाचा हा स्फटिकगृहीचा दिवा असाच प्रसन्नतेने तेवत रहावा. कारण ह्या दिव्याच्या एका किरणानेच सामान्य माणसांच्या जीवनातील अंधार चिरण्याचं व्रत स्वीकारले आहे. सीमाबांधवांना त्यातून स्वतःचे पाथेय सापडू शकेल!! किशनराव पाटील इंचूरकरांना त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त, ते शतायुषी होवोत, अशी शुभेच्छा!

**- जयप्रकाश दगडे**
**ज्येष्ठ पत्रकार, लातूर**

# ग्रामसभाच सुप्रिम पॉवर -देवाजी तोफ

## गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी स्मृती व्याख्यान माला

**जळगाव/प्रतिनिधी**

'महात्मा गांधीजी यांच्या 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनेवर आम्ही काम करत गेलो गावाच्या समस्या गावातच सोडविल्या आहेत. ग्रामसभेत सर्व सहमतीने स्वराज्यच्या दिशेने प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. ब्रम्हा, विष्णू, महेश याप्रमाणे लोकसभा, विधानसभा आणि ग्रामसभा होय यातील ग्रामसभा हीच सुप्रिम पॉवर आहे; यात महात्मा गांधी व विनोबा भावे यांची गामस्वराज्याच्यादृष्टीने सत्ताविकेंद्रीकरण ही संकल्पना दिसते ' असे महत्त्वपूर्ण विचार देवाजी तोफा व्यक्त केले. गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे आयोजित न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी स्मृती व्याख्यानमालेमध्ये सर्व सहमति से ग्राम स्वराज की ओर' याविषयावर देवाजी तोफा ह्यांनी दुसरे पुष्प गुंफले. गांधी रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, संचालक अशोक जैन यांनी ऑनलाईन उपस्थिती दिली. त्यांनी उपस्थितांशी सुसंवाद साधला. देवाजी तोफा, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक डॉ. सुदर्शन अय्यंगार यांचा सुतीहार देऊन सत्कार उदय महाजन, नितीन चोपडा यांनी केला. गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या वतीने महात्मा गांधीजींची प्रतिमा, खादीवस्त्र देऊन देवाजी तोफा यांचा सन्मान करण्यात आला. व्याख्याच्या सुरवातीला देवाजी तोफा, डॉ. सुदर्शन अय्यंगार यांच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या पुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले. गांधीतीर्थ येथे राष्ट्रीय गांधीवादी नेतृत्व शिबिरास उपस्थित युवक-युवतींनी 'गाव छोडत नहीजंगल छोडतं नहीं' हे आदीवासींचे गाणे म्हटले. सूत्रसंचालन डॉ. अश्विन झाला यांनी केले. आभार डॉ. सुदर्शन अय्यंगार यांनी मानले.




गांधी रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी व्याख्यानमालेची भूमिका स्पष्ट केली. त्यात गांधी रिसर्च फाऊंडेशचे संस्थापक अध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी हे गांधी विचारानुसार जीवन जगले त्यांनी सुरू केलेली परंपरा गांधी रिसर्च फाऊंडेशन कार्य करीत असल्याचे डॉ. अनिल काकोडकर म्हणाले. संचालक अशोक जैन यांनी महात्मा गांधीजींचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी देवाजी तोफा सारखे कार्य वाढले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा-लेखा गावाचा रोचक परिवर्तनाची प्रेरक कहाणी देवाजी तोफा यांनी मांडली त्यात ते म्हणाले की, पृथ्वीवरील मानव मंगळावर पोहोचला परंतु तो दुर्दैवाने माणसापर्यंत पोहोचू शकला नाही. विज्ञानाला दिशा नसते ती दिशा अध्यात्मातून मिळते. अध्यात्म म्हणजे आत्मा व शरीर हे विज्ञान आहे. जल, जंगल, जमीन आणि निसर्गापासून मानवाने शिकायला हवे असे महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट करत देवाजी तोफा यांनी विषयाची मांडणी केली. महिला सक्षमीकरणाशिवाय गावाचा विकास होणार नाही यासाठी गावात मातशक्तीला मानले पाहिजे. कुणी दारू पिऊन महिलेला मारहाण करत असेल तर महिलांना जाऊन त्याला समजावीले पाहिजे यातून ति एकटी नाही हा संदेश जातो. गावाच्या स्वावलंबनासाठी संसाधनांचा वापर, गावाच्या सर्व सहमतीतून विकास प्रक्रियेच्या निर्णयात प्रत्यक्ष सहभाग यासाठी ग्रामसभा महत्त्वाची मानली जाते. विशेष ग्रामसभेत प्रत्येकाने उपस्थित असणे अनिवार्य आहे. जर कुणी गैरहजर राहत असेल तर त्याचे कारण द्यावे लागते. ग्रामसभेत सर्व स्त्री-पुरुषांना आपापले मत मांडण्याचा समान अधिकार आहे. गावाच्या निर्णय घेण्यासाठी ग्रामसभा, अभ्यास करण्यासाठी अभ्यास मंडळ अशा दोन स्वतंत्र रचना आहेत. अभ्यास मंडळात फक्त चर्चा करायची, निर्णय घ्यायचा नाही असेही ठरलेले आहे. सरकारची योजना गावात राबविली जात नाही. कायदा कानून बनविले जातात पण त्यांचा फायदा किती मिळतो? ह्यावर अभ्यासपूर्ण अध्ययन, विचार करण्याची गरज असल्याचे मत देवाजी तोफा यांनी व्यक्त केले. दिल्ली, मुंबई हमारी सरकार, हमारे गाव में हम ही सरकार' असा नारा देण्याची गरज आहे. यातून महात्मा गांधीजींनी दिलेल्या विचारांना आत्मसात करून त्या मार्गावर चालणे म्हणजे खऱ्या अर्थाने माणूस होणे होय असेही त्यांनी सांगितले. ग्रामदान कायदा -१९६४ हे समजून सांगितले त्यासाठी तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या संवादाबाबतचे अनुभूव त्यांनी सांगितले. जमीन वाढत नाही तर लोकसंख्या वाढत चालली आहे. त्या सर्वाच्या गरजा पाहता अनेक समस्या निर्माण होतात. मात्र जेवढे विरोध प्रश्न निर्माण करून होत नाही तेवढी ती चर्चा करून सहज सोडविता येते यासाठी सकारात्मकता महत्त्वाची आहे.

सर्व सहमती कुठेच होणार नाही मात्र एक विचाराने, अभ्यासू पणाने विचार करून सामूहिक व लोकशाही पद्धतीने निर्णय घेणे महत्त्वाचे आहे. महात्मा गांधीजींना सांगितलेला अहिंसेचा मार्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनी दिलेल्या संविधानिक स्वातंत्र्यातून मी पणा सोडून आम्ही सर्व या भावनेतून प्रत्येकाने आचरण केले पाहिजे यातूनच गावाचा विकास आणि प्रगती होऊ शकते परिणामी देश बलशाली होऊ शकते असे महत्त्वपूर्ण विधान देवाजी तोफा यांनी केले.

# शाळा, महाविद्यालयातील लैंगिक अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी राज्यात प्रभावी उपाययोजना -उपमुख्यमंत्री

शाळा, महाविद्यालयातील किशोरवयीन मुलांमध्ये अश्लील व्हिडिओ व तत्सम चित्रिकरण यांच्या प्रभावामुळे विकृत दृष्टीकोन निर्माण होणे व त्यातून लैंगिक अत्याचार/ हिंसेच्या घटना घडू नयेत यासाठी राज्यात प्रभावी उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली. मुंबईतील माटुंगा येथील महानगरपालिकेच्या शाळेतील तेरा वर्षीय विद्यार्थिनीवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेबाबत सदस्य उमा खापरे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले होते. त्याला उत्तर देतांना उपमुख्यमंत्री श्री फडणवीस बोलत होते. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, माटुंगा येथील घटना चिंताजनक आहे. या घटनेचा तपास सुरू आहे. अशा विकृतींना आळा घालणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. सायबर गुन्ह्यांबाबत संबंधित प्राप्त तक्रारीची तांत्रिक तपासणी करण्यासाठी राज्यामध्ये प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलांमध्ये अश्लील चित्रिकरणाच्या प्रभावामुळे विकृती वाढतेय. ही चिंताजनक बाब आहे. लैंगिक अत्याचारासंबंधी व्हिडिओ व अन्य मजकूर याबाबतची माहिती मिळाल्यावर समाजमाध्यम व वेबसाईटवरून हटवण्यासंबंधी त्वरित कारवाई करण्यात येत आहे.तसेच राज्यामध्ये इंटरनेटवरील अशाप्रकारच्या मजकुरावर आणि वेबसाईटवर प्रतिबंध घालण्याचे काम सुरु आहे. राज्यातील सायबर गुन्ह्यांबाबत सायबर इंटेलिजन्स युनिट प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहे. यामाध्यमातून सायबर गुन्हेगारीवर वचक ठेवता येईल'', असे श्री.फडणवीस यांनी उत्तरात सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, राज्यातील काही मोठ्या शाळा, महाविद्यालयामध्ये सीसीटिव्ही बसवण्यात आले आहेत. मात्र, काही साधारण शाळा, महाविद्यालयांमध्ये सीसीटिव्ही बसविण्याची आवश्यकता आहे. याठिकाणी टप्प्याटप्प्याने सीसीटिव्ही बसविण्यासंदर्भात सूचना देण्यात येतील. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासंदर्भात चांगला, वाईट स्पर्श (सेव touch-bad touch) बाबत मार्गदर्शनपर प्रशिक्षण देण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. शाळा, महाविद्यालय परिसरातील कॅफेटेरिया व अन्य सुविधा यांचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण आणि गृह विभागाच्या सचिवांची समिती नेमून एक स्वतंत्र धोरण ठरविण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपप्रश्नाला उत्तर देतांना सांगितले. राज्यात किशोरवयीन मुलांचे प्रबोधन करण्यासाठी पोलीस दिदी' यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत.पोलीस दिदींची संख्या वाढविण्यात येत आहे. यात खासगी स्वयंसंस्थांचाही सहभाग घेत आहोत. शाळा, महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांना मोबाईल वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली असून शाळा प्रशासनास यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत. शालेय शिक्षण विभाग आणि गृह विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृतीसाठी बृहत कार्यक्रम हाती घेण्यात येईल, असे श्री. फडणवीस म्हणाले. शाळेच्या वाहनांवरील वाहनचालकांच्या नियुक्ती/ कामाबाबत लेखापरीक्षण (ऑडिट) करणे गरजेचे आहे. यासंदर्भात कायदे, नियम आणि संहिता आहेत. त्याचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात येतील, अशी माहिती देखील उपमुख्यमंत्री यांनी दिली. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सदस्य सर्वश्री प्रविण दरेकर, शशिकांत शिंदे यांनी उपप्रश्न उपस्थित केले होते.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# फोडाफोडीचे राजकारण करुन संघटना बळकट करण्याचा प्रयत्न!

## जिल्हा परिषदेतील विविध कर्मचारी संघटनेचा आरोप




**सोलापूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात भाजप सरकारने ईडी आणि दबाव तंत्राचा वापर करुन फोडाफोडीचे राजकारण करुन राज्यात सत्ता आणल्याची चर्चा आहे. त्याच धरर्तीवर आता सोलापूर जिल्हा परिषदेतील कर्मचारी युनियन कर्मचारी संघटनेच्या वतीने झेडपीतील विविध संघटनेतील कर्मचारी यांना अधिकाऱ्यांचा दबाव आणि विविध पदाचे आमिष दाखवून फोडाफोडीचे राजकारण करुन आपल्या संघटनेत विविध पदे कर्मचारी युनियन संघटना देत असल्याचा आरोप जिल्हा परिषदेतील विविध कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षांनी सा. 'क्राईम संध्या'च्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

सोलापूर जिल्हा परिषदेत कर्मचाऱ्यांच्या विविध संघटना आहेत. यामधील कर्मचारी महासंघटनेतील कर्मचारी तजमुल मुतवल्ली होते. त्यांनी कर्मचारी युनियन कर्मचारी संघटनेत गेले आहेत. तसेच लिपीकवर्गीय कर्मचारी संघटनेतून बसवराज दिंडोरे, बहुजन मागसवर्गीय कर्मचारी संघटनेतील कर्मचारी राजू मानवी आणि दिव्यांग कर्मचारी संघटनेतील महिला कर्मचारी यांच्यासह अनेक संघटनेतील कर्मचाऱ्यांनी हे जिल्हा परिषद कर्मचारी युनियन संघटनेत गेले आहेत. यातील काही कर्मचाऱ्यांना दबाव तर काहींना विविध पदे देण्याचे आमिष संघटनेतील काही नेत्यांनी दिले आहे. त्यामुळे विविध संघटनेतील कर्मचारी गेले आहेत. त्या कर्मचाऱ्यांना शुभेच्छा असून, इतर कर्मचाऱ्यांना बळजबरीने पदे दिले आहेत त्यांना आमचा तीव्र विरोध असल्याची माहिती सोलापूर जिल्हा परिषदेतील विविध संघटनेच्या नेत्यांनी दिली आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेतील लिपीकवर्गीय कर्मचारी संघटना, मागासवर्गीय बहुजन कर्मचारी संघटनासह इतर संघटनेने कर्मचारी युनियन संघटनातर्फे कर्मचारी यांना दबाव आणि विविध पदाचे आमिष दाखवून फोडाफोडीचे राजकारण करीत असल्याचा आरोप जिल्हा परिषदेतील काही संघटनेने केला असून, त्यावर तुमची प्रतिक्रिया काय, असे कर्मचारी युनियनच्या नेत्याला विचारले असता, आम्ही या विषयावर काहीही प्रतिक्रिया देणार नसल्याची भूमिका जिल्हा परिषदेचे प्रति सीईओ म्हणून ओखळले जाणारे नेते यांनी सा क्राईम संध्याशी बोलताना दिली आहे.

जिल्हा परिषदेतील कर्मचारी युनियन संघटनेच्या काही नेत्यांनी झेडपीतील विविध संघटनेतील कर्मचाऱ्यांवर दबाव तंत्राचा वापर करुन आपल्या संघटनेत घेतले आहेत. मात्र आमच्या संघटनेतील एकही कर्मचारी फोडले नाहीत. कारण आमच्या संघटनेतील कर्मचारी हे कट्टर आहेत. यूनियन मधील नेत्यांनी कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यापेक्षा दुसरेच राजकारण करीत फिरत असतात. त्यामुळे त्यांनी फिरण्यापेक्षा कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविले तर बरे होईल, असे मा.ब. कर्मचारी संघटन अध्यक्ष गिरीष जाधव यांचे म्हणणे आहे. तर कर्मचारी फोडाफोडीचे राजकारण करण्यापेक्षा कर्मचाऱ्यांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावा. जिल्हा परिषदेतील कर्मचारी संघटनेतील काही नेते हे विनाकारण राजकारण करीत असून, हे झेडपीतील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना माहिती आहे, असे लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी सांगितले.

# भिवंडीत बोगस डॉक्टर पती-पत्नी विरोधात कारवाई



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी या कामगार वस्तीच्या शहरात असंख्य झोपडपट्टी विभागांमधून बोगस डॉक्टर सर्रासपणे सर्वसामान्य नागरिकांवर औषध उपचार करून त्यांच्या जीवाशी खेळ करीत आहेत.आणि असे असताना याबाबत अनेक तक्रारी महानगर पालिका आरोग्य विभागाकडे होत असतात. नुकताच अशाच एका तक्रारीनंतर भिवंडी शहरातील हमाल वाडा या परिसरात वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या दोघा पती-पत्नीवर महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी यांनी गुन्हा दाखल केला आहे. मोमीन मुशर्रफ नूर मोहम्मद अशरफी वय ४६ व रायला मुशर्रफ मोमीन वय ४० असे कारवाई झालेल्या बोगस डॉक्टर पतीपत्नीचे नाव आहे. वरील दोघे बोगस डॉक्टर स्वतः कडे कोणतीही वैद्यकीय पदवी नसून मेडीकल कौन्सीलकडे नोंदणी नसताना त्यांनी आवामी इमदादी क्लिनीक उघडून त्या ठिकाणी नागरिकांवर उपचार करीत होते. दिनांक १ ते १० ऑगष्ट २०२२ दरम्यान या बोगस डॉक्टरांनी तनवीर गुलाम मुस्तफा मोमीन वय ५२ यांच्या वर या बोगस डॉक्टरांनी दवा उपचार करीत वेगवेगळया वैद्यकीय तपासण्या करायला भाग पाडून चुकीचे पध्दतीने दवाउपचार केल्याने त्यामध्ये तनवीर गुलाम मुस्तफा मोमीन यांचा मृत्यू झाला. या बाबत पालिका आरोग्य विभागाकडे तक्रार आल्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ शमीम सलाम अन्सारी यांनी त्याठिकाणी कारवाई केली असता ते कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र दाखवू न शकल्याने ते बोगस डॉक्टर असल्याने त्यांच्या विरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याने पोलिसांनी या बोगस डॉक्टर असलेल्या पतिपत्नी विरोधात भादवि कलम ३०४(२) सह मेडिकल प्रॅक्टीसनर ऍक्ट १९६१ चे कलम ३३व ३६ प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करून भिवंडी न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे.

# वडमुरंबी येथे ५०वे केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वडमुरंबी येथील जिल्हा परिषदेच्या केंद्रीय प्राथमिक शाळेत ५० वे केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन गुरुवार दि.२९ डिसेंबर रोजी गटशिक्षणाधिकारी व्यंकटराव बोईनवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख सदाशिव साबणे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी व्यंकटराव बोईनवाड हे होते व तसेच लोकनियुक्त सरपंच राम मोरे, केंद्रीय मुख्याध्यापक भरत निलेवाड, धनराज बिरादार, कुसुम बिराजदार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष परमेश्वर मामडे आणि केंद्रांतर्गत मुख्याध्यापक उपस्थित होते. वडमुरंबी येथील विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटातून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वडमुरंबी, प्राथमिक शाळा आंबेगाव, जीवन शिक्षण विद्यालय वडमुरंबी, विमलताई विद्यालय दवणहिप्परगा यासह आदी शाळांनी सहभाग नोंदविला, विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटातून वडमुरंबी शाळेचा मनोजकुमार शिवकुमार आंबेवाले याने इको फ्रेंडली टूथपेस्ट तयार करून प्रथम क्रमांक पटकावला. व तसेच दामाजी पाटील हा मिक्सर कटर हा प्रयोग सादर करून द्वितीय क्रमांक पटकाविला. तृतीय स्तरावर जीवन शिक्षण विद्यालयाची विद्यार्थिनी श्वेता चौधरी ही आहे. तर माध्यमिक गटातून भोगेश्वर विद्यालयाचा संविधान गायकवाड याने प्रथम क्रमांक पटकाविला व द्वितीय क्रमांक विमलताई विद्यालयाचा धीरज इंकुरे यांनी पटकाविला. शिक्षक गटातून मधुसूदन कुलकर्णी यांचा प्रयोग प्रथम आला. यावेळी निरीक्षक म्हणून विज्ञान शिक्षक कानमंदे, रणदिवे व फफागिरे यांनी काम पाहिले.

# मुलीच्या कबड्डी स्पर्धेत उज्ज्वल यश

लातूर : स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर व जिल्हा क्रीडा कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महानगरपालिका १९ वर्षाखालील जिल्हास्तरीय मुलीच्या कबड्डी क्रीडा स्पर्धेत श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील क्रीडा विभागातील महिला कबड्डी स्पर्धकांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्याबद्दल त्यांचा महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांत उटगे आणि शि.वै.खानापुरे यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये संघ कर्णधार सिद्धी बालकुंदे, अंबिका सोनवणे, प्राची कोरे, संस्कृती मेनकुदळे, प्रेरणा रत्नपारखे, गायत्री कोतवाल, वैष्णवी स्वामी, सानिका पवार, शिवकन्या मुरगे, ज्ञानेश्वरी क्षीरसागर, दीक्षा बिराजदार आणि प्रतीक्षा शहागडकर या सर्व महिला खेळाडूंचा संघामध्ये समावेश होता. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, मराठी विभाग प्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.गुणवंत बिराजदार, प्रा.रमेश तडवी, प्रा.आशिष क्षिरसागर, संदीप मोरे, शुभम बिराजदार व विष्णू तातपुरे आदी उपस्थित होते.

# ग्रामीणमधील ९३ किमी पाणंद रस्ते कामाला आ.रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मंजुरी

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या ४९ गावातील ५३ शेत/ पाणंद रस्त्याच्या ९३ किलोमीटर कामाला भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाने मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत २३ डिसेंबर रोजीच्या परिपत्रकानुसार मंजुरी दिली आहे. अनेक गावच्या शेत रस्त्याची मोठी दुरावस्था झाल्याने तर काही ठिकाणी शेत रस्तेच नसल्याने त्याचा शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील अनेक गावच्या शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन भाजपाचे नेते तथा जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी अनेक गावच्या आणि वाडी तांड्यातील विविध शेत रस्त्यांच्या कामांना मान्यता मिळावी यासाठी शासन दरबारी वेळोवेळी पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन शासनाने लातूर ग्रामीण मतदार संघातील ४९ गावातील शेत रस्त्यांना मंजुरी दिली आहे. त्यात लातूर तालुक्यातील २५ गावात ४४ किलोमीटर, रेणापूर तालुक्यातील १५ गावात ३१ किलोमीटर आणि भादा सर्कल मधील ८ गावात १८ किलोमीटर याप्रमाणे जवळपास ९२.५० किलोमीटर शेतरस्त्यांना मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजने अंतर्गत मंजूरी मिळाली आहे. लातूर ग्रामीण मतदार संघातील शेतरस्त्यांना मिळालेल्या मान्यतेत लातूर तालुका - खुंटेफळ १ किमी, रामेश्वर २ किमी, सामनगाव २ किमी, गातेगाव १.५ किमी, तांदुळवाडी २ किमी, काटगाव २ किमी, कासार जवळा २ किमी, भातांगळी २.५ किमी, मुरुड १ किमी, गुंफावाडी १ किमी, चिंचोली ब. १ किमी, कासारखेडा २ किमी, बोडका १ किमी, दिंडेगाव १ किमी, मसला २ किमी, शिराळा २ किमी, रुई २ किमी, सारसा २ किमी, भोईसमुद्रगा २ किमी, कोळपा २ किमी, ढोकी २ किमी, रामेगाव २ किमी, भडी २ किमी, टाकळी शि. २ किमी, ममदापूर २ किमी, रेणापूर तालुका - पानगाव ४.५० किमी, फरदपूर २ किमी, वाला १.५० किमी, गरसुळी २ किमी, मोरवड २ किमी, बिटरगाव २ किमी, भोकरंबा २ किमी, मुरढव २ किमी, कुंभारवाडी २ किमी, तळणी २ किमी, मोहगाव २ किमी, नरवटवाडी १ किमी, मुसळेवाडी २ किमी, रामवाडी ख. १.५० किमी, कारेपूर २ किमी आणि भादा सर्कल मधील - उटी बु. २ किमी, सिंदाळा २ किमी, भेटा२ किमी, सत्तरधरवाडी २ किमी, टाका २ किमी, कवठा केज २ किमी, काळमाथा २ किमी, वरवडा २ किमी, येल्लोरीवाडी २ किमी याप्रमाणे मंजूरी मिळाली आहे. सदरील कामासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्याकडून निधी उपलब्ध होणार असून ही सर्व कामे २०२२-२३ या आर्थिक वर्षात सुरू करण्याच्या अटीवर शासनाने मंजुरी दिली असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मतदार संघातील ४९ गावातील ५३ शेत पाणंद रस्त्यांना जरी मंजुरी मिळाली असली तरी उर्वरित प्रस्तावित केलेल्या कामांना येत्या पंधरा दिवसात राज्य शासनाकडून मंजुरी मिळणार आहे. मतदार संघातील ९३ किलोमीटर शेत रस्त्याच्या कामाला मान्यता दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि रोहियो मंत्री संदीपान भुमरे यांचे भाजपाचे नेते आ. रमेश कराड यांनी आभार मानले.



# देवणी तालुक्यातील ८ ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंचांच्या अध्यक्षतेखाली आठ उपसरपंचांची ग्रामसभेत होणार निवड

**देवणी/शकील मनियार**




देवणी तालुक्यात झालेल्या ८ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीत सदस्य पदावर निवडून आलेल्या उमेदवारां पैकी ८ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचांची निवड ३ व ४ जानेवारी रोजी लोकनियुक्त सरपंचांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभेत होणार असल्याची माहिती बुधवार दि.२८ डिसेंबर रोजी देवणी तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाच्या वतीने देण्यात आली. देवणी तालुक्यातील ८ ग्रामपंचायतीच्या निवडणूकीनंतर लोकनियुक्त सरपंचांच्या अध्यक्षतेखाली पहीलीच ग्रामसभा ३ जानेवारी रोजी टाकळी, सयदपूर, दवणहिप्परगा व हेळंब येथे तर ४ जानेवारी रोजी बोंबळी खुर्द, हिसामनगर, बोरोळ व वडमुरंबी येथे होणार असून सदर ग्रामपंचायत येथे लोकनियुक्त सरपंचांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभेत उपसरपंचांची निवड होणार आहे. देवणी तालुक्यातील ८ ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाच्या निवडीसाठी निवडणूक निरिक्षक तथा अध्यासी अधिकारी म्हणून कनिष्ठ अभियंता नागेश स्वामी, विस्तार अधिकारी जीन. एन. गोपनवाड, विस्तार अधिकारी राजकुमार आल्लापुरे, विस्तार अधिकारी डी. बी. हैबतपुरे यांची नेमणूक महाराष्ट्र राज्य आयोग यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केली आहे.

# दंत रोगांवर मात करण्यासाठी उपचार पद्धतीस तंत्रज्ञानाची जोड आवश्यक!

## डॉ. हनुमंत कराड यांचे मत; एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी**

मानवी जीवनाला तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे जीवन शैलीत अमुलाग्र बदल झालेले आहेत. जीवन शैलीतील बदलामुळे अनेक आव्हानात्मक व गुंतागुंतीचे आजार उत्पन्न होत आहेत. याला दंत रोग ही अपवाद राहिलेले नाहीत. सध्या स्थितीतील दंत रोगांचे वाढते प्रमाण लक्षात घेता परिणामकारकर उपचार पध्दती व तज्ज्ञ यंत्रणेस आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सर्व प्रकारच्या दंत रोगांवर मात करणे शक्य आहे, असे मत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केले. येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात त्रिमितीय दंत चिकित्सा काळजी आणि माहिती आधारीत औषधोपचार' या विषयावर डॉ. हनुमंत कराड बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे, उप प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, डॉ. यतीशकुमार जोशी, सर्व विभाग प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, निसर्गता दात हे सर्वात मजबूत अवयव असून मनुष्याच्या जबड्यात अत्यंत गुंतागुंतीच्या भागात दातांची मजबूतपणे ठेवण आहे. वेळोवेळी उद्भवणारे दंत रोग हे प्रथम:वस्थेत समजून येत नसल्यामुळे अचुक व वेळीच निदानासाठी निष्णात दंत रोग तज्ज्ञ, अद्यावत उपकरणे आणि त्यास आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणे आवश्यक असून अशा स्वरुपातील व दंत रोग उपचार सुविधा एमआयडीएसआर दंत रुग्णालयाच्या माध्यमातून दिली जात आहे. दंत रोगाची प्राथमिक स्वरुपात तज्ज्ञाव्दारे तपासणी झाल्यानंतर आजाराचे स्वरुप कळण्यासाठी आवश्यक त्या तपासण्या योग्य व अचुक निदानापर्यंत पोहचण्यासाठी आवश्यक असतात. दंत रोगाच्या निदानाअंती समोर आलेल्या आजारावर दंत रोगाशी सबंधीत तज्ज्ञांव्दारे उपचार करणे आवश्यक आहे. दंत रोगावर परिणामकारक उपचारासाठी दंत रोग तज्ज्ञ, आधुनिक यंत्रसामुग्री या सोबतच सहाय्यक यंत्रणाही तितकीच महत्वाची असते. तसेच एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या माध्यमातून दंत चिकित्सेतील पदवी व पदव्युत्तर उच्च शिक्षणाव्दारे सक्षम दंत रोग तज्ज्ञांची फळी निर्माण केली जात असून दंत रुग्णांना सुरक्षीत व सर्वसमावेशक दंत रोग उपचार सेवा मिळावी यासाठी दंत रोग तज्ज्ञांनी तत्परतेने सेवा द्यावी असे, डॉ. कराड यांनी शेवटी सांगीतले. या कार्यक्रमासाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, दंत रोग तज्ज्ञ, अंतरवासीता डॉक्टर व सहाय्यक कर्मचारी उपस्थित होते.

# श्रीराम फायनान्सच्या कार्यालयात विलीनीकरणाचा जल्लोष!



**लातूर/प्रतिनिधी**

श्रीराम सिटी युनियन फायनान्स लिमिटेड आणि श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स लिमिटेड या दोन वित्तीय संस्थेचे विलनीकरण झाले असून आता श्रीराम फायनान्स लिमिटेड असे नामकरण करण्यात आले आहे. शिवाय ही संस्था भारतातील गैर बँकिंग क्षेत्रातील नंबर वन बनली आहे. त्यामुळे लातूर शहरातील बार्शी रोडवरील श्रीराम फायनान्सच्या शाखेत सर्व विभागाचे व्यवस्थापक, कर्मचारी यांनी केक कापून व फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून रिजनल बिजनेस हेड शिवाजी कुट्टे, असिस्टंट जनरल मॅनेजर संतोष पाटील, रिजनल मॅनेजर नितीन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. ग्राहकांचे प्रतिनिधी म्हणून गातेगाव विविध विकास कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन विरसेन भोसले, सरसवतीताई भुतडा तसेच सिनिअर मॅनेजर अजितसिंह दौडे, डिव्हिजनल मॅनेजर वैभव घाटे, श्रीराम चिट्सचे मॅनेजर प्रविण पवार, सहायक व्यवस्थापक विजय देशमुख, अर्जुन कांबळे, वसुली विभागाचे विभागीय मॅनेजर बद्रीलाल पुंड, सुनील जाधव, कल्याण भिसे, बालाजी शिंदे, हनुमंत तेलंगे, अजय उगीले, लीगल मॅनेजर महेश शिंदे, नितीन स्वामी, संतोष मोरें यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्रीराम फायनान्सच्या वाटचालींबद्दल व आगामी संकल्पाबद्दल विचार मांडले. श्रीराम फायनान्स चा आतापर्यतचा टर्न ओव्हर १ लाख ७१ हजार करोड रुपयांचा आहे देशभरात ३६०० शाखा असून ५७ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. अशी माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीपीयू चे मॅनेजर विनायक बिडवे यांनी मांडले तर शेवटी सिद्धेश्वर स्वामी यांनी आपल्या मिमिक्रीतून श्रीराम फायनान्सचे महत्व विशद करून सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# पोलीस ठाण्यातून पलायन झालेला आरोपी सापडला कर्नाटक राज्यात

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यातून पोलिसांच्या हाताला झटका देऊन पलायन झालेला आरोपी कर्नाटक राज्यातील येथे लपून बसला होता अशी गोपनीय माहिती मिळवून शोध घेत सापळा रचून पोलिसांनी मोठ्या शिपातीने या आरोपीस अटक केली आहे. ही सदरची कामगिरी अक्कलकोट दक्षिण व उत्तर पोलिसांनी संयुक्तरीत्या केली, पलायन झालेल्या आरोपीच्या शोधासाठी चार पथके तैनात करण्यात आलेली होती. गोपनीय मिळालेल्या माहितीनुसार कर्नाटक राज्यातील कलबुर्गी जिल्ह्यातील आळंद तालुक्यातील सरसंबा येथे देवराज पवार या आरोपीस पोलिसांनी सापळा रचून अटक केली पोलीस ठाण्यात चौकशी करीत असताना आरोपीने अचानक उठून पोलिसांच्या हाताला झटका देऊन पलायन झाला होता ही घटना अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात २४ डिसेंबर रोजी घडली होती याची अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात नोंद झाली होती पलायन झालेल्या आरोपीचे नाव देवराज दिलीप पवार (१९) असे आहे. या आरोपी विरुद्ध अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात चोरी केल्याच्या कलमान्वये गुन्हे दाखल झाला होता. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, अक्कलकोट उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली, अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, महेश भावीकट्टी, पोलीस उपनिरीक्षक रेवणसिद्ध काळे, सिद्राम धायगुडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल अजय भोसले, राजकुमार कोळी, मल्लिनाथ कलशेट्टी, सुभाष दासरे, पोलीस नाईक नबीलाल मियावाले, सुरेश जाधव, गणेश अंगुले, काशिनाथ सदाफुले, जगदीश राठोड, प्रमोद शिंफाळे, शिवलिंग स्वामी, श्रीकांत जवळगे व सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार खंडू माळी यांच्या पथकाने कारवाई केली आहे.

02 To 08 JANUARY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/31/2022 8:43 PM Page 1



# कोकण विभागीय माहिती कार्यालयात संजिवनी पाटील-जाधव यांनी सहायक संचालक पदाचा कार्यभार स्विकारला

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कोकण विभागाच्या विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक (माहिती) या रिक्त पदाचा कार्यभार श्रीमती संजिवनी पाटील-जाधव यांनी आज स्विकारला. यावेळी कोकण विभागाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. श्रीमती पाटील-जाधव ह्या यापूर्वी विभागीय संचालक कार्यालय, औरंगाबाद येथे उपसंपादक या पदावर कार्यरत होत्या. त्यांना २१ डिसेंबर २०२२ च्या शासन निर्णयानुसार सहाय्यक संचालक (माहिती) या पदावर त्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. श्रीमती पाटील-जाधव यांनी यापूर्वी उप माहिती कार्यालय शिर्डी येथे उपसंपादक या पदावर त्यानंतर विभागीय संचालक कार्यालय औरंगाबाद येथे उपसंपादक या पदावर काम केले आहे. कला शाखेतील



पदवी, पत्रकारिता या माध्यमातून बीजे, एमजे, एमफील या क्षेत्रातून शिक्षण घेतलेल्या श्रीमती पाटील-जाधव यांना पत्रकारीतेचा दांडगा अनुभव आहे. शासन सेवेत येण्यापूर्वी त्यांनी औरंगाबाद येथील दै.लोकपत्र या दैनिकात उपसंपादक या पदावर काम केले असून आकाशवाणी केंद्रात प्रादेशिक वृत्तनिवेदिका तसेच एमसीएन(माध्यम)या वृत्तवाहिनीत निवेदिका म्हणून काम पाहिले आहे. यावेळी डॉ.गणेश मुळे म्हणाले की, श्रीमती पाटील-जाधव यांच्याकडे असलेल्या पत्रकारितेतील अनुभवाचा कोकण विभागात शासनाच्या विविध योजनांच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी नवनवीन उपक्रम राबविण्याच्या दृष्टीकोनातून उपयोग होईल. कोकण विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रीमती संजिवनी पाटील-जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

# एनसीसीच्या वतीने स्वच्छता अभियान

लातूर : राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर व यशवंत विद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमानाने लातूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थान परिसरात छउउ च्या वतीने स्वच्छता अभियान दिनांक २८.१२.२०२२ रोजी घेण्यात आले. यात ५३ महाराष्ट्र बटालियन व ७ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन छउउ चे एकूण ११५ NCC कॅडेट्स सहभागी होऊन मंदीर परिसरातील स्वच्छता केली. या स्वच्छता अभियानाचे प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती शेळके एच.के., प्रदीपकुमार भोसले धर्मादाय सह-उपायुक्त लातूर, अशोक भोसले विश्वस्त सिध्देश्वर देवस्थान, दयानंद कांबळे पर्यवेक्षक यशवंत विद्यालय लातूर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात छउउ कॅडेट्सना संबोधित करतेवेळी श्रीमती शेळके एच.के. यांनी विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करून जिथे स्वच्छता तेथील आरोग्य निरोगी राहते त्यामुळे स्वच्छतेची सुरुवात आपल्या घरापासून केली पाहिजे असे आवाहन केले. एनसीसी ॲकॅडेट्सनी राबविलेल्या स्वच्छता मोहिमेबद्दल अशोक भोसले यांनी आभार व्यक्त करून पुढे क्लीन सिटी, ग्रीन सिटी, यही मेरी लातूर ड्रीम सिटी करण्याची जिम्मेदारी युवा पिढी व छउउ कॅडेट्सने घ्यावी असे म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक NCC चे लेफ्ट अर्चना टाक यांनी केले तर सूत्रसंचालन चीफ ऑफिसर महावीर काळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य सदाशिव शिंदे, यशवंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जाधव, उपमुख्याध्यापक जाधव एस. डी. श्री. सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानचे विश्वस्थ विक्रम गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे, सुरेश गोजमगुंडे, नरेश पंड्या, चंद्रकांत परदेशी व व्यवस्थापक दत्ता सुरवसे यांनी सहकार्य केले.

पान १ वरून...

## प्रियकरासाठी रक्ताच्या नात्याचा बळी...

ठाण्यातील मुंब्रा परिसरातील आंबेडकर नगर येथील फातिमा हाईट्स या इमारतीत राहणाऱ्या एका तरुणीने आपल्या प्रियकराच्या मदतीने आईची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आपल्या १७ वर्षीय मुलीचे एका तरुणासोबत प्रेम संबंध असल्याचे आईला समजले. त्यानंतर आपल्या मुलीच्या भविष्याचा विचार करून आईने प्रियकरासोबत असलेल्या नात्यावरून तिला वारंवार टोकण्यास सुरुवात केली. त्याच रागातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सबा मेहंदी हाश्मी असे मृत्यू झालेल्या आईचे नाव आहे. हत्या करणारी अल्पवयीन मुलगी आणि तिचा प्रियकर हे दोघेही फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. सबा यांच्या जवळच्या नातेवाईकांनी त्यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद लागत होता. त्यानंतर नातेवाईकाने मुलीला फोन केला, मात्र तिच्याकडूनही कुठलाच प्रतिसाद न मिळाल्याने नातेवाईकाला संशय आला आणि त्यांनी सबा यांच्या राहत्या घरी धाव घेतली. घराला बाहेरून कुलूप होते आणि घराच्या आतून फोनच्या रिंगचा आवाज येत असल्याने नातेवाईकांचा संशय बळावला आणि त्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यावेळी सबा या रक्ताच्या थारोळ्यात मृत अवस्थेत जमिनीवर पडल्या होत्या त्यानंतर या हत्येचा उलगडा झाला. यावेळी सबा यांच्या मानेवर, गळ्यावर, छातीवर धारदार सुरीने वार करून त्यांना जीवे ठार मारल्याचे आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच मुंब्रा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करत ३०४/३४ प्रमाणे हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. सध्या महिलेची हत्या करणाऱ्या अल्पवयीन मुलीचा आणि तिच्या प्रियकराचा शोध पोलीस घेत असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कडलग यांनी दिली आहे.

## प्रेमात अडथळा येताच ड्रायव्हरचे ...

संजय आणि कन्हैयालाल हे दोघे मामेभाऊ असल्याने कन्हैयालालचे संजयच्या घरी कायम येणे जाणे असायचे त्याची संजयची पत्नी सुनिता हिच्याशी जास्तच सलगी वाढली होती. तिच्या सौंदर्यावर तो फिदा झाला होता. काही तरी कामाचे निमित्य काढून तो संजयच्या माघारी त्याच्या घरी येत होता. तो घरी नसला की तिच्याशी तासन तास तो बोलत बसायचा तो तिला भाभी म्हणत असल्याने भाभीच्या मनात तो आपले प्रेम निर्माण करीत होता. ती चालू असल्याने आपल्याला नक्की लाईन देईल याची त्याला खात्री होती. सुनिताबरोबर बोलण्यासाठी तो संधी शोधत होता. त्याला माहित होते की रात्रीच्या खेळात संजय तिला खुश ठेवत नाही तो दारूच्या नशेत यषऊन तसाच झोपत आहे त्या सुखासाठी सुनिता ही तडफडत आहे हे त्याने ओळखले होते. म्हणून तो तिला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करीत होता. त्यात तो लवकरच यशस्वी झाला. सुनिताला ही माहित होते की, कन्हैयालालची बायको मुले गावी आहेत त्यामुळे त्याला आपल्याकडून काय पाहिजे हे तिने बरोबर ओळखले होते. त्यामुळे ती ही त्याच्याशी जवळीक साधत त्याला भैय्या म्हणत होती. पण तिच्या मनात तो दिवसा भैया आणि रात्री सैया असावा असे होते. दोन्हीकडून आग बरोबर लागली असल्याने त्या दोघांना जवळ यायला आणि शरीरसंबंध बनवायला वेळ लागला नाही. कन्हैयालाल हा गोव्यात एकटाच राहत असल्याने त्याचा तसा खर्च कमी होता. त्यामुळे त्याच्याकडे पैसे शिल्लक राहत होते. एकदा दोनदा त्याने सुनिताची पैशाची गरज भागवली असल्याने तिने ही तिची शारीरिक गरज भागवली होती. कन्हैयालालने तिला त्या खेळात इतके खुश केले की, तिला आता आपला नवरा संजयची कीव येत होती. गेल्या दीड दोन वर्षापासून त्या दोघांचे ते संबंध होते. या गोष्टीची भणक अलिकडेच संजयला लागलेली होती. त्यामुळे तो पत्नी सुनिताबरोबर दररोज दारू पिऊन भांडत होता. त्या भांडणात ती त्याला काही ऐकत नव्हती उलट ती त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत त्यालाच चार सुनावत होती. त्यामुळे संजयला बायकोचा आणि कन्हैयालालचा राग येत होता. आपल्या बायकोला त्याने जाणीवपूर्वक नादी लावले आहे त्याच्यामुळे आपला संसार उध्दवस्त झाला आहे म्हणून त्याने मामेभाऊ कन्हैयालाल याला आपल्या घरी येऊ नकोस, माझ्या बायकोला नादाला लावू नकोस तिच्याबरोबर संबंध ठेऊ नकोस असे बजावले होते. पण ऐकेल तो कन्हैयालाल कसला. त्याला सुनिताची चटक लागलेली होती. त्याच्या बायकोची कसर ती पुर्ण करीत होती. त्यामुळे कन्हैयालाल हा संजय घरी नसताना तिला भेटायला येत होता. तिच्याशी लाडीगोडी लावीत तिला आपल्या अंगाखाली घेऊन मदमस्त तिची जवानी उपभोगत होता.आपल्या माघारी कन्हैयालाल हा आपल्या घरी येत आहे त्याला ताकीद देऊन ही तो ऐकत नाही याचा राग संजयला आला होता. काही ही करून त्याला आपल्या बायकोपासून वेगळे केले पाहिजे नाही तर आपला संसार उघडयावर पडेल याची भिती संजयला होती. त्याने बायकोला ही बऱ्याचवेळेला समजावून सांगितले होते. पण ती ही त्याचे काही ऐकत नव्हती. अलिकडे तर संजय हा दारू पिऊन घरी येवू लागला होता. दारूच्या नशेत बायकोला शिव्या देऊन मारहाण करणे हाच त्याच उदयोग झाला होता. सोमवार दि.२६ डिसेंबर रोजी रात्री ९च्या सुमारास कन्हैयालाल हा त्याच्या घरातून बाहेर पडताना दिसला तर त्याची बायको सुनिता ही दरवाज्यात गाऊनवर उभी असल्याचे त्याला दिसले घरासमोर काही अंतरावर कन्हैयालालने आपला ट्रक उभा केलेला होता. कन्हैयालालला आपल्या घरातून बाहेर पडताना बघून त्याने त्या दोघांचा तो कार्यक्रम झाला असल्याचे ओळखले. तो अगोदरच दारू प्यायलेला होता. दोघांना त्याने रंगेहात पकडले होते.त्यामुळे त्याच्या तळपायची आग मस्तकात गेली होती. आता कन्हैयालालला सोडायचे नाही म्हणून तो आपल्या ट्रककडे जाणाऱ्या कन्हैयालालचा पाठलाग केला.तो केबीनमध्ये जात असताना मागून त्याच्या केबीनमध्ये तो ही शिरला. तो दारूच्या नशेत असल्याने त्याला तो काय वाटेल तो बोलत होता.तुझे माझ्या बायकोबरोबर काय काम असते. तिच्याबरोबरचे संबंध तोडून टाक म्हणून तुला सांगितले असताना तू तिला भेटायला माझ्या घराकडे येतोस म्हणत तो केबीनमध्येच त्याच्या अंगावर जाऊ लागला होता. या गोष्टीचा राग कन्हैयालाला आला होता. तो मी तुलाच भेटायला आलो होतो. पण तु लवकर घराकडे आला नाहीस म्हणून मी चाललो होतो अशी सारवासारव केली. परंतु संजयला त्या दोघांचे संबंध माहित असल्याने तो जास्तच भडकला होता.तो त्याला केबीनमध्ये मारहाण करीत असताना कन्हैयालालने आपल्याकडील धारदार चाकू काढला आणि रागाच्या भरात संजयच्या गळयात खुपसला. त्यासरशी त्याच्या गळ्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. काही वेळातच तो तडफडत केबीन मधील सीटवर पडला. रक्ताच्या थारोळ्यात तो निपचीप पडला. त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर तो सावरला. सुनिताला बाहेर बोलावून आपण तिच्या नवऱ्याचा खून केला आहे हे त्याने तिला सांगितले. तिने ही मनावर घेतले नाही तिला ही तो नकोच होता. म्हणून ती त्याला म्हणाली बरे झाले आपल्या मार्गातील काटा गेला. त्यानंतर त्या दोघांनी त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याचा त्यांनी विचार केला. पहाटे ४च्या सुमारास त्याने आपला ट्रक सांकवाळच्या दिशेन नेला.तेथील एका पेट्रोल पंपाच्या मागे मोकळी जागा होती. हे त्याला माहित होते. तेथे काही लोक बांधकामचा कचरा टाकतात हे ही त्याला माहित होते. त्या बांधकामच्या कचऱ्याच्या ढिगात त्याचा मृतदेह त्याने नेऊन टाकला. आणि तेथून ट्रक घेऊन माघारी फिरला. सकाळी त्याने आपल्या मालकाला भेटून रात्री घडलेली सगळी घटना सांगून आपण आपल्या मित्राचा खून केल्याचे सांगितले. त्याच्याकडून ही माहिती ऐकल्यानंतर त्याच्या मालकाने या घटनेची माहिती वेर्णा पोलीसांना दिली. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळावरील बांधकामवरील कचऱ्याच्या ढिगातून संजयचा मृतदेह बाहेर काढला. घटनास्थळाचा आणि घटनेचा पंचनामा करून या घटनास्थळी मयत संजयच्या बायकोला बोलावून घेतले आणि मृतदेहाची ओळख पटविली. ही घटना कोणत्या कारणातून कुणी केली आहे याचा अंदाज पोलीसांना आलेला होता. पंचनाम्यानंतर मृतदेह उतरीय तपासणीसाठी गोमॅतकीय रुग्णालयात पाठवून दिला. पोलीसांनी कन्हैयालाल यादव याला ताब्यात घेऊन त्याला वेर्णा पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती त्याने पोलीसांना दिली.या घटनेची फिर्याद वेर्णा पोलीसात कन्हैयालाल यादव याच्या मालकाने दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी संजय यादव (वय ३५) रा.सध्या झुआरीनगर मुळ उत्तरप्रदेश याच्या खून प्रकरणी कन्हैयालाल यादव (वय ३६) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला सुरा आणि ट्रक जप्त केला. या घटनेचा पुढील तपास वास्कोचे पोलीस उपाधीक्षक सलीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वेर्णा पोलीस करीत आहेत. विवाह बाहय त्या संबंधात आपली बायको अडकली की पती सैरभर होतो. काही ही करून तो तिला त्या संबंधापासून लांब राहण्याचा सल्ला देत असतो पण ती काही त्याचे ऐकत नाही, त्याच्या मनात आपल्या बायकोला नादी लावणाऱ्याचा काटा काढण्याचा विचार येतो त्यामुळे याचा जाब तो त्याला विचारयला जातो आणि तेथेच त्याचा घात होतो हेच या घटनेवरून दिसून येते.

## मनाविरुद्ध लग्न झाल्याने शीतल...

पण त्याचे कोणाला काही पडलेले नसते. या प्रकरणातही मुलाने पसंती कळवली आणि तिच्या आई वडीलांनीही मुलगा पसंत केला. दि. १४ ऑक्टोबर २०२२ रोजी शितल आणि पांडुरंग यांचे ल झाले. शितल जाधव कुटुंबातून चव्हाण कुटुंबामध्ये आली. खरे तर शितलला पांडुरंग पसंतच नव्हता, तिने आई- वडीलांना सांगायचा प्रयत्न केला असला तरी आपली मुलगी अल्लड आहे. तिला आपलं हित कशात आहे हे समजत नाही असे समजून तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. शितलने चव्हाण कुटुंबामध्ये घुश्श्यातच प्रवेश केला होता. तिच्या मनात नसतांना हे लग्न झाल्याने ती नाराज होती. लग्नानंतर दोन-तीन दिवस पाहुण्यांच्या गोतावळ्यात तिने थोडेसे जमवून घेतले, पण घरातील पाहुणे- रावळे गेल्यावर तिने पांडुरंगला स्पष्ट सांगितले की 'तू मला पसंत नाहीस. मला तू आवडत नाहीस'. तिच्या या वाक्याने पांडुरंग हादरून गेला. त्याने याबाबत आपल्या आई-वडीलांना सांगितले. त्यावेळी त्याच्या आई-वडीलांनी त्याची समजूत काढली. 'आता तुमचं लग्न झालंय. ती अजून लहान आहे. हळूहळू रुळेल ती. तू काळजी नको करु, यावर पांडुरंगही गप्प बसला. नवीन असल्यानं आपली बायको बिथरली, तिला आपण पसंत नसलो तरी पुढे तिला आपण नक्की आवडू अशी मनाशी आशा बाळगत तोही शांत बसला. सासरी शितलला सगळे चांगले जपत होते. तिला नाराज करत नव्हते, तरीसुद्धा ती काहीतरी खोटे कारण काढून भांडण काढत असे. आपल्या मनातील गोष्ट आपल्या आई-वडीलांना न सांगता तिने सारा राग सासरच्या लोकांच्यावर काढण्याचे ठरवले होते. तिच्या या वागण्याने सासरचे लोक जुळवून घेत गप्प बसत असले तरी ती आता स्पष्टपणे सगळ्यांनाच सांगू लागली की 'मला नवरा पसंत नाही. एके दिवशी सहजच बोलून गेली की 'मला नवरा पसंत नाही. माझे दुसऱ्यावर प्रेम आहे. तिच्या सासूने ही गोष्ट ऐकली होती. तरीसुद्धा लग्न झाल्यामुळे या गोष्टीचा फार गवगवा केला तर सगळंच धुळीस मिळेल म्हणून सगळे जण गप्प बसले. दिवस सरू लागले होते. 'लग्न होवून २१ दिवस झाले होते. शितल अजूनही चव्हाण कुटुंबात रूळत नव्हती. त्यादिवशी कहरच झाला. सोमवार दि. ७ नोव्हेंबर २०२२ ची रात्र रात्रीचे जेवण सगळ्यांनी एकत्र केले. शितल आणि पांडुरंग साधारण नऊ वाजता आपल्या खोलीत झोपायला गेले. तास-दीड तास उलटून गेला. साडेदहा वाजता शितल अचानक खोली बाहेर येवून ओरडू लागली. अहो, तुमच्या लेकाला काहीतरी झालंय. बेशुद्ध पडला तो. असे ओरडतच तिने ही बाब आपल्या सासू-सास-यांना सांगितली. पांडुरंगचे आई-वडील त्याच्या खोलीत धावत पळत गेले. त्यांचा मुलगा बेशुद्ध पडला होता. त्यांनी लगेच वाहन बोलावून आपल्या मुलाला एका खाजगी रुग्णालयात नेले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू झाले, पण दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. ८ नोव्हेंबर रोजी पांडुरंगची प्राणज्योत मालवली. दिवसभर चांगला ठणठणीत असणारा आपला मुलगा असा अचानक कसा बेशुद्ध झाला? याबाबत पांडुरंगच्या आई- वडीलांनी शितलला विचारले, कारण जेवण होईपर्यंत पांडुरंग व्यवस्थित होता. त्यानंतर तो आपल्या पत्नीसमवेत त्याच्या खोलीत गेल्यावरच ही बाब घडल्याने साहजिकच शितलला याबाबत विचारले असता तिने मला काय माहित? कदाचित हार्टअॅटॅक तर नाही ना?' अशी शंका व्यक्त केली. त्यावेळी पांडुरंगचे आई-वडीलही गप्प बसले होते, कारण हृदयविकाराबाबत काहीही सांगता येत नाही. कोणतीच लक्षणे नसतांनासुद्धा एखाद्याला असा अॅटॅक येवू शकतो, हे त्यांना माहिती होते. अशी अनेक उदाहरणे घडल्याचे त्यांनी ऐकले होते. त्यामुळे त्यांनी सुनेवर त्यावेळी विश्वास ठेवला, पण जेव्हा डॉक्टरांनी पांडुरंगला मृत घोषीत केले, तेंव्हा त्यांनी आपल्या मुलाची पहाणी केली, तेव्हा त्यांना गळ्यावर व्रण दिसून आले. आता त्यांना नक्कीच हा घातपात असावा अशी शंका आली आणि त्यांनी गेवराई पोलीस ठाणे गाठले. आपल्या मुलाच्या मृत्यूप्रकरणी पांडुरंगची आई निलाबाईने गेवराई पोलीस ठाण्यात तक्रार देवून आपल्या सुनेवर संशय व्यक्त केला. तिने यावेळी पोलिसांना सांगितले की, आपली सून शितल हिला तिचा नवरा म्हणजे आमचा मुलगा पसंत नव्हता. तिने लग्न झाल्यानंतर तसे सांगितले होते. त्याचा राग नेहमी ती पांडुरंगवर काढून भांडण करत असे. तसेच एके दिवशी बोलता-बोलता माझे तुझ्यावर प्रेम नाही, दुसऱ्यावर प्रेम आहे असे म्हटले होते. ही बाब पोलिसांना सांगितल्यावर पोलिसांनी मृतदेहाचे विच्छेदन करण्याचा निर्णय घेतला. गेवराई उपजिल्हा रूग्णालयात विच्छेदन झाले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विच्छेदन अहवालामध्ये गळा आवळल्याने मृत्यू' असा अभिप्राय दिला. पोलिसांनी पांडुरंग राजाभाऊ चव्हाण (वय २४) याच्या खून प्रकरणी त्याची पत्नी शितल पांडुरंग चव्हाण (वय १९) हिला ताब्यात घेतले. तिच्याकडे चौकशी केली असता तिने गुन्हा कबुल केला. आपल्याला नवरा पसंत नव्हता म्हणून त्याचा खून केला हे तिने चौकशीत सांगितले. सध्या शितल चव्हाण पोलीस कोठडीत आहे. अधिक तपास सुरू आहे.

## परदेशी लपलेला बिळातून बाहेर...

सुमारास मीरारोडच्या कशमीरा परिसरातील पेणकरपाडा येथे वास्तव्याला होते. यावेळी त्यांच्या शेजारी जगरानी देवी प्रजापती यांचे कुटुंब वास्तव्याला होते. या तिघांनी जगरानी देवी यांच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. यानंतर जगरानी देवी यांचे पती राजनारायण प्रजापती यांनी सर्व लोकांसमोर राजकुमार चौहान आणि सरोज बंधू यांच्या कृष्णकृत्याचा पर्दाफाश केला होता. यावेळी जगरानी देवी यांचा पती आणि या तिघांमध्ये मोठे भांडण झाले होते. हाच राग मनात ठेवून राजकुमार चौहान आणि सरोज बंधुंनी १६ नोव्हेंबर १९९४ रोजी जगरानी देवी आणि त्यांच्या तीन लहान मुलांचा निर्घृणपणे खून केला होता. या लहान मुलांचे वय अनुक्रमे पाच, दोन आणि तीन महिने इतके होते. या तिघांनी जगरानी देवी आणि त्यांच्या मुलांवर चाकूचे वार करून त्यांना ठार मारले होते. जगरानी देवी यांचे पती रात्री ११ वाजता घरी आल्यानंतर हा प्रकार उघड झाला होता. त्यानंतर राजनारायण प्रजापती यांनी पोलिसांत धाव घेतली होती. तेव्हापासून पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते. परंतु, तिन्ही मारेकरी फरार असल्याने या प्रकरणाचा तपास फारसा पुढे सरकला नव्हता. दरम्यानच्या काळात २००६ साली एका अपघातामध्ये राजनारायण प्रजापती यांचे निधन झाले होते. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही केस गेल्यावर्षी रिओपन झाली होती. त्यावेळी कशमीरा पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. जगरानी देवी यांच्या मारेकऱ्यांचा माग काढण्यासाठी मुंबई पोलिसांचे एक पथक त्यावेळी उत्तर प्रदेशात गेले होते. हे पथक तब्बल २० दिवस वाराणसीत ठाण मांडून बसले होते. तेव्हा पोलिसांना राजकुमार चौहान उर्फ काल्या उर्फ साहेब याच्याविषयी माहिती मिळाली होती. राजकुमार चौहान हा २०२०पासून कतारमध्ये कामाला असल्याचे पोलिसांनी समजले होते. या माहितीच्याआधारे पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली होती. पोलिसांनी राजकुमार चौहान याच्या पासपोर्टची तपासणी केल्यानंतर त्यांच्याविरोधात लूकआऊट नोटीस जारी केली होती.

पान ८ वरून...

## एलईडी लॅम्प बसवितो म्हणून ग्रासवेकांनी...

करण्यात येईल. असे लेखी आश्वासन देण्यात आले. परंतू त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने मी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर यांची भेट घेतली असता त्यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती मोहोळ यांचेशी संपर्क साधा असे सांगितले. त्यानूसार संबंधित विभागाकडे चौकशी केली असता दि.१० जानेवारी २०२२ रोजी कोणताही आदेश नसतांना फेर चौकशी केली व सर्व खोट्या कागदपत्रे सादर करून गटविकास अधिकारी मोरे व संबंधित विस्तार अधिकारी बागवाले यांनी आर्थिक अमिषा पोटी ग्रामसेवकावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचा आरोप माजी सरपंच राजगुरु यांनी केला आहे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी व्ही.सी. मध्ये व्यस्त**

मोहोळ तालुक्यातील पेनूर गावातील माजी सरपंच श्वेता राजगुरु यांनी तत्कालीन ग्रामसेवक पाटील यांनी ग्रामपंचायतमध्ये अफरातफर केला असून, याला मोहोळ पंचायत समिती येथील अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे ग्रामपंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाठिशी घालत असल्याचा आरोप केला आहे. याविषयी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे यांची प्रतिक्रिया घेण्यासाठी गेले असता ते व्ही.सी मध्ये व्यस्त असल्याने त्यांची भेट झाली नाही.

## होटगी रोड विमानतळावरून नागरी ...

गेलेले वैभव पुन्हा एकदा मिळवण्याकरिता विमानसेवा फार आवश्यक असल्याचे महत्त्व मंचचे सदस्य विजय कुंदन जाधव यांनी विशद केले. सोलापूरात मोठ्या मल्टिनॅशनल उद्योग आणि नोकऱ्या गेल्या चार दशकात सोलापूरचे ४ लाख तरुण नाईलाजाने आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या भुरसटलेल्या विचारसरणीला वैतागुन कायमस्वरूपी सोलापूर सोडून जाण्यास भाग पडले, सोलापूरच्या अधोगतीस भाड पाडणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी आज सोलापूरातील तरुण, उद्योजक, व्यापारी, संस्था, संघटना आणि व्यक्ती बहुसंख्येने ह्या मुक मोर्चात स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले असून येणाऱ्या काळात ह्यांच्या एकजुटीची ताकद येणाऱ्या सर्व निवडणुकीत दिसून येणार असल्याचे मंचचे सदस्य मिलिंद भोसले यांनी विशद केले. सोलापूर शहर आता वृध्द आणि पेंशनर्सचे शहर म्हणून ओळखले जात आहे कारण इथले सगळे तरुण कायमस्वरूपी सोलापूर सोडून उद्योग आणि व्यवसायासाठी इतर शहरात स्थलांतरित झालेले आहेत, ज्याचा विपरीत परिणाम सोलापूरच्या अर्थव्यवस्थेला अब्जावधी रुपयांचे नुकसान झाल्याचे अभ्यासपूर्ण मत योगीन गुर्जर यांनी मांडले. पुनम गेट समोर झालेल्या सभेत मुकेशभाई मेहता, ज्येष्ठ सनदी लेखापाल श्रीनिवास वैद्य, रोहित मोरे, अमृता अकलूजकर, अनंत कुलकर्णी, विश्वनाथ गायकवाड आदींनी होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी परखड आपले विचार व्यक्त केले. मेकॅनिकी चौकातुन निघालेला मुक मोर्चा पुन गेट पर्यत पोहचे पर्यत सर्व सहभागी सदस्यांच्या हातात प्रशासनाच्या लालफितशाही भोंगळ आणि दफ्तर दिरंगाईबद्दल काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त करण्यात आला. सदर मुक मोर्चात नवमतदार विद्यार्थ्यांनसहित सोलापूरातील प्रतिष्ठीत आणि नामांकित संस्था, संघटना आणि व्यक्तींचा स्वयंस्फूर्तीने आणि भरघोस प्रतिसाद मिळाला.

## चक्रधर, प्राथमिक व माध्यमिक ...

प्रत्यक्षात मुलांना वनात जाऊन भोजनाचा आनंद घेता यावा तसेच आपल्या परिसराची ओळख मुलांमधयै व्हावी या हेतूने हे वनभोजन आयोजित करण्यात आले होते. दिवसभर इयत्तानुसार कृतीयुक्त गीते, रंगभरण, शब्द भेंडी, चारोळी, चित्र काढून त्यात रंग भरणे, कोडी विचारणे, एकपात्री अभिनय, प्रश्नमंजुषा, निसर्गाविषयी माहिती, शेतीविषयक माहिती, गप्पा-गोष्टी,नृत्य अश्या विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांचा भरभरून असा प्रतिसाद मिळाला विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी या उपक्रमाविषयी यावेळी आपले मत व्यक्त केले. आणि कार्यक्रम संपन्न झाला. या उपक्रमासाठी मा.सुलतान शेख , मा.मोईझ शेख यांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, ईतर कर्मचारी वर्ग यांनी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी खूप परिश्रम घेतले.

## श्रमिक हक्क अभियानचे धरणे ...

अॅड.जयवर्धन भाले, अनिताताई कांबळे, दशरथ कांबळे, उमाकांत कांबळे, पद्माकर कांबळे, बालाजी टाळीकुठे, देवानंद सावंत, बळीराम बनसोडे, परमेश्वर होळकर, शिवाजी माने, विजया गायकवाड, अभंग जाधव, बालिकाबाई होळकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. सदरील मागणीचे निवेदन हे नायब तहसिलदार विलास तरंगे यांना देण्यात आले.

## भिवंडीतील विस्डम अकादमी शाळेतून ...

मालमत्तेचे नुकसान करण्याची धमकी देतात, अशी कारणे या विद्यार्थ्यांना शाळेतून काढताना देण्यात आली आहेत. दरम्यान खाजगी शाळांच्या या अरेरावी विरोधात दि २९ डिसेंबर ते ५ जानेवारी दरम्यान शिक्षा सुधार समितीच्या वतीने पालिका मुख्यालया समोर मेरी पाठशाळा हे आंदोलन सुरू केले आहे. यामध्ये मुले रस्त्यावर बसून धडे गिरवीत अभ्यास करीत अभिनव आंदोलन करीत आहेत.

02 To 08 JANUARY 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 12/31/2022 8:53 PM Page 1



# अखेर वसईत सर्वधर्मीय दफनभूमीचे काम सुरू

## आंदोलन करणाऱ्यांनी मानले पालिका प्रशासनाचे आभार



**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात सुमारे २५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असून त्यांच्या अंत्यविधी करणाऱ्या जागांची फार कमतरता आहे. त्यातच अल्पसंख्याक समाजाचीही लोकसंख्या वाढलेली असून त्यांच्यासाठी लागणाऱ्या दफनभूमी, कब्रस्तानची योग्य व्यवस्था नाही म्हणूनच बसिन तालुका मुस्लिम कब्रस्तान कमिटी सुमारे ३३ वर्षापासून वसईतील विविध ठिकाणी जिथे अल्पसंख्याक समाजाची वस्ती आहे अश्या २६ ठिकाणी मुस्लिम समाजाच्या कब्रस्तान व ८ ते १० ठिकाणी ख्रिश्चन आणि लिंगायत समाजासाठी दफनभूमीची मागणी आहे. तसेच या कब्रस्तानच्या मागणीसाठी युवक काँग्रेसच्या माध्यमातून समीर सुभाष वर्तक, उपाध्यक्षः पालघर लोकसभा युवक काँग्रेस यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत १ जुलै २०१३ ते ३ जुलै २०१३ मध्ये आमरण उपोषण केले होते. तेव्हा उपोषणाची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण यांनी महापालिका व जिल्हाधिकारी यांना तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर अल्पसंख्याक विभाग, मंत्रालय येथे अनेक बैठका झाल्या आणि आमची मागणी असलेल्या २६ ठिकाणापैकी सर्वप्रथम दिवाणमान येथील सर्व्हे नंबर १७६ मध्ये ११ एकर जागेत सर्वधर्मीय दफनभूमीचे काम चालू झाले. परंतु महानगरपालिकेच्या चुकीमुळे संबंधित बांधकामास पर्यावरण विभागाची परवानगी नसल्याने राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) बांधकाम तोडण्याचे आदेश दिले. त्यानंतर कल्लन खान यांनी सहकाऱ्यांसोबत KGN सोशल वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून लवकरात लवकर सर्वधर्मीय दफनभूमी मिळावी म्हणून आमरण उपोषण केले होते. या सर्वधर्मीय दफनभूमीसाठी समीर सुभाष वर्तक आणि कल्लन खान आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा आंदोलनासोबतच सातत्याने पाठपुरावा चालू होता त्यामुळे मागील ५ ते ६ वर्षापासून रखडलेले दिवाणमान येथील सर्व्हे नंबर १७६ मधील सर्वधर्मीय दफनभूमीचे काम वसई विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी आवश्यक सर्व परवानग्या घेऊन मागील दीड ते दोन महिन्यांपूर्वी या सर्वधर्मीय दफनभूमीचे काम चालू केलेले आहे आणि लवकरच काम पूर्ण होऊन वसईतील सर्वधर्मीय नागरिकांची दफनभूमीच्या अपुऱ्या जागेअभावी होणारी गैरसोय समाप्त होणार आहे. म्हणूनच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष आणि यासाठी उपोषण करणारे समीर सुभाष वर्तक, केजीएन सोशल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष आणि उपोषणकर्ते कल्लन खान आणि बसिन तालुका मुस्लिम कब्रस्तान कमिटीचे सचिव फारूक मुल्ला यांनी सहकाऱ्यांसोबत महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेऊन आभार मानले. यावेळी महाराष्ट्र काँगेसच्या पर्यावरण विभागाचे प्रदेश सरचिटणीस टोनी डाबरे व अम्मार पटेल, वसई विरार जिल्हा काँग्रेसच्या पर्यावरण विभागाचे जिल्हाध्यक्ष डेरीक फूर्ट्यांडो, कार्याध्यक्ष संदीप किणी तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन कुडु, रोहित कुडु, रवीं खालिद शेख, जमील देशमुख उपस्थित होते.

# नियोजित ध्येय प्राप्तीसाठी विद्यार्थ्यामध्ये जिद्द आणि सातत्य महत्वाचे – प्रा.राहुल वाघमोडे




**लातूर/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात ध्येय निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. नियोजित ध्येय प्राप्तीसाठी जिद्द आणि सातत्य महत्वाचे असल्याचे प्रतिपादन प्रा.राहुल वाघमोडे यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाद्वारे स्पर्धा परीक्षा व सेट-नेट या विषयावर विस्तार व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मौने हे होते तर विचारमंचावर भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.यशवंत वळवी यांची प्रमुख उपस्थिती होती पुढे बोलताना प्रा.राहुल वाघमोडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा व नेट-सेट परीक्षेचा अभ्यास करताना नियमित वाचन आणि लिखाण करणे आवश्यक आहे असे सांगून काही महत्वाच्या टीप्स विद्यार्थ्यांना सहज आणि सोप्या भाषेत सांगीतल्या. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मौने म्हणाले की, परिश्रम हाच यशाचा पाया आहे. विद्यार्थ्यांनी अपडेट राहून स्वतःला सक्षम बनवावे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.यशवंत वळवी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.विकास वाघमारे यांनी तर आभार डॉ.श्रीराम भालेराव यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राज्यशास्त्र विभागातील डॉ.ललिता शेट्टे व पदवी आणि पदव्युत्तर विभागातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.

# दागिने चोरणाऱ्या महिलेस केले जेरबंद



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरांमध्ये रिक्षामध्ये सहप्रवासी महिलेच्या पर्समधील दागिने चोरणाऱ्या संशयित सुषमा बापूजी चव्हाण (२५) या महिलेस सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. सोलापूर शहरातील जेलरोड पोलीस ठाणे हद्दीतील शांती चौक, पाण्याची टाकी ते मार्केट यार्ड या दरम्यान फिर्यादी अनुराधा गिरी नरोणे या रिक्षांमधून प्रवास करीत होत्या त्यांच्यासोबत तीन अनोळखी महिला सहप्रवासी होत्या. नरोळे या रिक्षातून उतरल्यानंतर त्यांचे पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरी झाल्याचे लक्षात आले त्यावेळी त्यांचा संशय रिक्षा मधील अनोळखी व्यक्ती तीन सहप्रवासी महिला यांच्यावर होता. नरोळे यांनी याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. सोलापूर गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळाच्या सर्व सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली असता हा गुन्हा रेकॉर्डवरील महिला सुषमा चव्हाण व तिच्या दोन अनोळखी महिलांनी केल्याचे निष्पन्न झाले त्यानंतर सुषमा हिला चौकशीसाठी ताब्यात घेतल्यानंतर तिने हा गुन्हा केल्याचे कबूल केले तिच्या वाटणीस आलेले सुमारे १६ ग्रॅमचे सोन्याचे दागिने तिने काढून दिले ही सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील व अंमलदार विजयकुमार वाळके, श्रीकांत पवार विद्यासागर मोहिते यांनी केली आहे.

# राज्यातील ६0 हजार अंगणवाड्यांना वीज जोडणीसाठी २0 कोटी रुपयांची तरतूद करणार -मंत्री मंगलप्रभात लोढा




**नागपूर/प्रतिनिधी**

राज्यातील ६० हजार अंगणवाड्यांना वीज जोडणी नाही. तेथे वीज जोडणी देण्यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करून येत्या तीन महिन्यात या सगळ्या अंगणवाड्यांना वीज पुरवठा होईल, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज विधानसभेत दिली. याशिवाय, अंगणवाडी कार्यकर्तींना मानधन वाढविण्याचा प्रस्ताव नियोजन विभागाकडे पाठविण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. सदस्य सुनील टिंगरे यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता. त्याला उत्तर देताना मंत्री श्री. लोढा यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, राज्यात १ लाख १० हजार अंगणवाड्या आहेत. त्यापैकी ९५ हजार ग्रामीण भागात तर १५ हजार शहरी भागात आहेत. ग्रामीण भागात अंगणवाड्यांचे वीज देयक देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत यांची असते. परंतु काही ठिकाणी निधी अभावी हे पैसे दिले गेले नसल्याने अशा अंगणवाड्यांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला. राज्यात वीज जोडणी नसलेल्या ६० हजार अंगणवाड्या आहेत. महिला व बालविकास विभागाकडून २ कोटी रुपयांची तरतूद करून तेथे वीज जोडणी दिली जाईल, अशी माहिती मंत्री श्री. लोढा यांनी दिली. याशिवाय, अंगणवाड्या बळकटीकरणासाठी आपण राज्यातील ५ हजार अंगणवाड्या स्मार्ट बनवत आहोत. याशिवाय, अंगणवाडी दत्तक योजना आपण राबवित आहोत. त्यासाठी समाजातील विविध संस्था, उद्योग यांना पत्र पाठवून त्यांच्या सीएसआर मधून निधी मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती मंत्री श्री. लोढा यांनी दिली. ग्रामविकास विभागाला सांगून जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून १० टक्के निधी महिला व बालविकास विभागाला देण्याचा निर्णय यापूर्वी झाला आहे. तो निधी मिळाला तर हा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे, असेही त्यांनी सांगितले. अंगणवाड्यांमध्ये सामान्य कुटुंबातील मुले शिकतात. त्यांच्यासाठी आपण विविध उपक्रम हाती घेत आहोत. मुंबई मध्ये आपण २०० कंटेनर अंगणवाडी सुरू केल्या आहेत. याशिवाय, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये २०० बालवाडी सुरू करण्यात आल्याची माहिती मंत्री श्री. लोढा यांनी दिली. या चर्चेत सदस्य राहुल कुल, बाळासाहेब पाटील, संग्राम थोपटे, यशोमती ठाकूर यांनी सहभाग घेतला.

# देवणी वडमुरंबी येथे समता बस्व संदेश पदयात्रेचे जल्लोषात स्वागत



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वडमुरंबी येथे समता बस्व संदेश पदयात्रेचे शुक्रवार दि.३० डिसेंबर रोजी दुपारी आगमन झाले. यावेळी वडमुरंबी येथील शरण - शरणयु भाविक भक्तांच्या वतीने टाळ - मृदंग आणि जगद्गुरु महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयघोषांच्या गजरात स्वागत करण्यात आले. समता संदेश समता नायक जगद्गुरु महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या विचारांची आणि वचन साहित्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील कुरुळा ते बिदर जिल्ह्यातील बस्वकल्यान येथे जाणाऱ्या पदयात्रेचे आगमन देवणी तालुक्यातील वडमुरंबी येथे होताच स्थानिक भाविक भक्तांच्या वतीने पदयात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी शिवानंद हैबतपुरे, माजी सरपंच शिवराजप्पा बिरादार, कल्याणराव पाटील, ग्रामपंचायत सदस्य संतोष बिरादार, शिवराज बिरादार, धनराज बिरादार, राजकुमार स्वामी, कमलाकर मुर्गेप्पा यांच्या सह महिला उपस्थित होत्या.

# किल्लारीला तालुक्याचा दर्जा द्या; अन्यथा आत्मदहन करू गावकऱ्यांचा तीव्र इशारा!

**औसा/प्रतिनिधी**

किल्लारी तालुका मागणीसाठी वेळोवेळी रस्ता रोको आंदोलन, निवेदन देण्यात आलेले आहेत. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ६७ गावातील किल्लारी ही मुख्य बाजारपेठ आहे. तालुक्यासाठी लागणारे खुली जागा व इतर पुरक गोष्टीची या ठिकाणी पूर्तता आहे. ३० ते ४० वर्षापासूनच्या जुन्या मागणीनुसार किल्लारी शहरास तालुक्यासह नगरपंचायतीचा दर्जा देण्यात यावा. यापूर्वी वरिष्ठ कार्यालयाकडे निवेदन देऊन पाठपुरावा केलेला आहे. गाव व परिसरातील जनतेच्या मागणीचा विचार करून तत्काळ किल्लारीला तालुका करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. अन्यथा गुरुवारी (ता. २६ जानेवारी) प्रजासत्ताक दिनी मुंबई येथे मंत्रालयासामोर प्रभारी सरपंच युवराज गायकवाड, विविध कार्यकारी सेवा सोसायटी तळणीचे व्हाईस चेअरमन किशोर जाधव, किशोर जाधव, भूकंपग्रस्त कृती समिती अध्यक्ष अमर बिराजदार, सांगितले. ग्रामपंचायत सदस्य विजय भोसले, गोविंद भोसले, गुंडाप्पा बालकुंदे, रोहीदास हजारे यांनी सामूहिक आत्मदहन करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी लातूर यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा विरोधी पक्ष नेते अजित पवार, विधानपरीषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, पोलिस अधीक्षक लातूर, तहसीलदार औसा, पोलिस ठाणे किल्लारी यांच्याकडे देण्यात आले आहेत. दरम्यान भुकंपग्रस्ताचा तालुका करणे हाच आमचा हेतू आहे. त्याद्वारे किल्लारी आणि परिसरातील बावन्न गावच्या नागरिकांच्या विविध कागदपत्रे आदीच्या समस्या सुटणार आहेत. वारंवार निवेदने देऊनही आम्हाला दाद मिळत नसल्याने हतबल होऊन आत्मदहन सारखी टोकाची भूमिका घेण्याची वेळ आली आहे. अशी प्रतिक्रिया किल्लारी गावचे प्रभारि सरपंच युवराज गायकवाड यांनी दिली आहे.

# सिंधिकामठ बंधाऱ्याचे ३४ जुने लोखंडी गेट पळविले; अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील सिंधिकामठ येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे ३४ जुने लोखंडी गेट अज्ञात आरोपीने पळविल्या प्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती देवणी पोलिसांनी दिली. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, सिर्धीकांमठ येथील कोल्हापुरी बंधारा येथे पाटबंधारे विभागा अंतर्गत सन २०१५ मध्ये १७६ लोखंडी गेट बसण्यात आले होते. त्यापैकी ३४ लोखंडी गेट खराब झाल्याने ते दि.१५ मार्च २०२२ रोजी नदीपात्रा बाहेर काढले होते. व ते नदीकाठावरच ठेवण्यात आले होते. त्यानंतर दि. २० नोव्हेंबर २०२२ रोजी सर्व गेट नविन जुने असे टाकण्यात आले होते. त्यानंतर १५ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास नदीवर जावुन पाहिले ३४ हजार रुपये किमतीचे ३४ जुने लोखंडी गेट दिसुन आले नाहीत ते कोणीतरी चोरुन घेऊन गेले आहेत. या प्रकरणी अजय दिनकरराव पाटील पाटबंधारे विभाग निलंगा यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २९७/२०२२ कलम ३७९ भादवी प्रमाणे अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे अधिक तपास पोलीस हेडकॉंस्टेबल विनायक सदाशिव कांबळे हे करीत आहेत.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात समाजकार्य विद्यार्थ्यासाठी कॅम्पस मुलाखतीला उस्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी**




श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग आणि एज्युकेशन रिलायन्स लातूर पॅटर्न, प्रायव्हेट लिमिटेड, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने टेलीकॉलर कम एज्युकेशन कौन्सिलर या पदासाठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागामध्ये समाजकार्य विद्यार्थ्याकरिता दि.२७/१२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा. एकूण ३० जागासाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते याला उमेदवारांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. निवड झालेल्या उमेदवारांना लवकरच बोलविले जाणार असून त्यांना दरमहा दहा ते पंधरा हजार रुपये मानधन सुद्धा देण्यात येणार आहे. या निवड प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मौने, प्रा.काशिनाथ पवार, डी.एस.पुरी, के.आर.शेख, श्रीराम कुलकर्णी आणि प्रा.आशिष स्वामी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, रिलायन्स लातूर पॅटर्नचे संचालक उ.वी.होणराव, समाजकार्य विभागातील डॉ.संजय गवई, प्रा.दत्ता करंडे, प्रा.नागेश जाधव, विरसेन उटगे, नंदू काजापुरे आणि के.आर.कोळी आदींनी सहकार्य केले.


## जिल्हा परिषद पालघर

### ग्रामीण पाणी पुरवठा विभाग पालघर

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा इंडिया मार्क-II हातपंप दुरुस्ती करता सुटेभाग, हातपंप संच, असेंब्ली, खास हत्यारे व जी.आय. रायझर पाईप (IS 1239 Part 1), खरेदी करणेचा वार्षिक दरकरार करणे. या कामाची Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ३०/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १३/०१/२०२३ रोजी सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर


# अ.भा.परिवर्तन मराठी साहित्य परिषदेत सामील होण्यासाठी संपर्क साधावा -रमेश हणमंते



**लातूर/प्रतिनिधी**

यवतमाळ येथे साहित्यिक आनंदकुमार झेंडे यांनी नवोदित साहित्यिकांच्या प्रतिभेला मंच उपलब्ध करुन देण्यासाठी नव्याने स्थापन केलेल्या अखिल भारतीय परिवर्तन मराठी साहित्य परिषदेशी जुडण्यासाठी नवोदित साहित्यिकांनी त्वरीत संपर्क साधावा असे आवाहन लातूर विभागीय अध्यक्ष कवी रमेश कोंडिबा हणमंते (८४५९१८८४१७) यांनी केले आहे. साहित्य निर्मिती ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. त्यासाठी नवनवीन प्रतिभावान पुढे येत असतात, पण नव्यांना जुने मंच स्थान देत नाहीत,त्यामुळे नवोदित्यांच्या साहित्याचे धुमारे चोहिकडे पसरू शकत नाहीत, ही उणीव लक्षात घेवून नवोदितांच्या सर्व प्रकारच्या साहित्याला प्रतिष्ठा मिळवून देवून नवोदितांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी हे मंच निर्माण केले असून,याचे विनामूल्य सदस्य होण्यासाठी नवोदितांनी आपले पूर्ण नाव, लेखन प्रकार, मोबाईल नंबर, वरील वॉट्सअपवर पाठवून देवून ही वैचारिक साहित्य चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी त्वरीत संपर्क साधावा असे आवाहन लातूर विभागीय अध्यक्ष कवी रमेश हमणंते यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात बारावी विज्ञान वर्गाच्या विद्यार्थिनींना नीट व जेईई पुस्तकाचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी**

भारत सरकार द्वारा आयोजित माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे विग्यान ज्योती कार्यक्रमांतर्गत जवाहर नवोदय विद्यालय, लातूरतर्फे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील बारावी विज्ञान वर्गाच्या विद्यार्थिनींना नीट व जेईई पुस्तकाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मौने यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.संजय पवार, कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, प्रा.रवींद्र सुदाम, डॉ.गुणवंत बिरादार, प्रा.माधव नायणे, ग्रंथपाल मधुकर निकुंबे, नवोदय विद्यालयाचे एस.पी.बडवे व जे.ए.मांडवकर यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने म्हणाले की, बारावी विज्ञान विद्यार्थ्यासाठी नीट आणि जीईई परीक्षा अत्यंत महत्त्वाची असते. या परीक्षे संदर्भातील सर्व पुस्तकांचा संच नवोदय विद्यालयातील शिक्षकांनी आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींना उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि दिलेल्या पुस्तकांचा आपण अभ्यास करून त्यामध्ये उज्ज्वल यश संपादन करावे असा सल्लाही त्यांनी याप्रसंगी विद्यार्थिनींना दिला.

02 To 08 JANUARY 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 12/31/2022 8:44 PM Page 1



# एलईडी लॅम्प बसवितो म्हणून ग्रासवेकांनी केली अफरातफर!

## जिल्हा परिषद अधिकारी पाठिशी घालत असल्याचा माजी सरपंच श्वेता राजगुरु यांचा आरोप

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सन २०२० मध्ये दिवाळीमध्ये गावात एल.ई.डी लॅम्प बसवितो म्हणून तत्कालीन ग्रामसवेक पाटील यांनी ६५ हजार रुपयांचा चेक घेतला होता. मात्र गावात फक्त चार हजारांचे बल्ब बसवून ग्रामसेवकांनी अफरातफर केला असल्याचा आरोप सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील पेनूर येथील माजी सरपंच श्वेता राजगुरु यांनी केला आहे. याविषयी गेल्या दोन वर्षापासून मोहोळ पंचायत समिती आणि सोलापूर जिल्हा परिषदेच्या अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रार करुन तत्कालीन ग्रामसेवकांवर कारवाई केली जात नसल्याचा आरोप माजी सरपंच राजगुरु यांनी केला आहे.



यावेळी माजी सरपंच राजगुरु म्हणाल्या, पेनूर गावचा सरपंच पदाचा कार्यभार सांभाळत असताना नोव्हेंबर २०२० मध्ये दिपावली असलेली कारणाने गावामध्ये एल.ई.डी. लॅम्प बसविणे कामी ग्रामसेवक पाटील यांना १४ वा वित्त आयोगातुन ६५ हजार रुपयांचा चेक देण्यात आला. माझा कार्यकाल संपुन एक महिना झाला तरीही गावामध्ये एल.ई.डी. लॅम्प बसविले नसल्याचे व या रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले. याबाबत मी वेळोवेळी संबंधीत विभागाला लेखी तक्रार करुनही कार्यवाही न झाल्याने दि.२० डिसेंबर २०२१ रोजी जि.प. सोलापूर येथे बेमुदत धरणे आंदोलनास बसले होते. त्यावेळी पोलीस प्रशासनामार्फत उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर यांची भेट घेतली. त्यानूसार सोलापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी यांनी मोहोळ येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडून चौकशी अहवाल मागवला व त्या अहवालानुसार ग्रामसेवक यांचेवर योग्य ती कार्यवाही ...पान ६ वर

### चौकशीमध्ये खोटे कागदपत्रे सादर

पेनूर गावामध्ये वाडया वस्त्यावर दिवाबत्तीची कोणतीही सोय नसतांना व विद्युत मंडळाकडून दिवाबत्तीसाठी कोणतेही कनेक्शन नसतांना त्या ठिकाणी लॅम्प बसविण्यात आले आहेत. असे चौकशी अहवालात सांगण्यात आले असून, ही खूप मोठी फसवणूक आहे. सद्य स्थितीला १४ ते १५ महिने झाले व जर लॅम्प वाडी वस्तीवर बसविले असतील तर ते लॅम्प सद्य स्थितीलाही तिथे उपलब्ध असायला हवेत. परंतू त्या ठिकाणी एकही लॅम्प अथवा विदयुत मंडळाचे विदयुत कनेक्शन (स्ट्रीट लाईट) कनेक्शन उपलब्ध नाही. फेर चौकशी खोटी कागदपत्रेसादर करुन माझी व संपूर्ण गावाची दिशाभूल करुन ग्रामपंचायतीच्या रकमेचा फसवणूक करून अपहार करणाऱ्या ग्रामसेवक पाटील यांना गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पाठीशी घालत आहेत. व हे प्रकरण जाणुन बुजून दडपण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरी सदर ठिकाणी आपल्या अधिकारा अंतर्गत स्पॉट व्हिजीट करुन योग्य तो अहवाल सादर करुन संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजी सरपंच राजगुरु यांनी केली आहे.

# होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठीच्या मुक मोर्चास तरुणांचा मोठा सहभाग




**सोलापूर/प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्पां पैकी केंद्रीय नागरी उड्डयन मंत्रालयाच्या उडान योजने अंतर्गत होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा तातडीने सुरू करण्यासाठी आज सोलापूर विकास मंचच्या वतीने आयोजित मुक मोर्चात सर्वसामान्य सोलापूरकरांनी स्वयंस्फूर्तीने बहुसंख्येने उपस्थित राहिले. मॅकेनिक चौकातुन निघालेल्या हा मुक मोर्चा सरस्वती चौक, चार हुतात्मां पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क चौक, सिद्धेश्वर मंदिर रोड, पासपोर्ट कार्यालय मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय आवारतील पुनम गेट येथे विसर्जित होऊन त्याचे सभेत रुपांतर झाले. होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सेवेस प्रमुख अडथळा असलेले सर्व अडथळे तात्काळ दुर झाल्यावर केंद्रीय नागरी उड्डयन मंत्रालयाच्या उडान योजने अंतर्गत अलाईंझ एअरची सोलापूरकरांना सोलापूर हैद्राबाद आणि स्पाईस जेटची सोलापूर बंगलोर ह्या मार्गावर तात्काळ विमानसेवा सुरू होणार असुन त्याचा फायदा सोलापूरकरांना होणार असल्याची माहिती सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा यांनी उपस्थितांना दिली. विमानसेवा नसल्याने सोलापूरकरांचे अब्जावधी रुपयांचे नुकसान झाले असून सोलापूरचे ...पान ६ वर

# श्रमिक हक्क अभियानचे धरणे आंदोलन



**देवणी/प्रतिनिधी**

राज्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमाकूल करावीत, गायरान जमीन अतिक्रम नियाकुल करण्याचा कायदा करावा आदींसह विविध मागण्यांसाठी श्रमिक हक्क अभियानाच्यावतीने गुरुवारी (दि. २९) रोजी देवणी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून महसूल प्रशासनाच्या मार्फत राष्ट्रपती, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले, दिलेल्या निवेदनात शासकीय जमीनीवर असलेले गरिबांची घरे त्यांच्या नावे करावे, घरकुलासाठी शासकीय जागा द्यावी, संगायो, इंगायो व निराधार श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा ३ हजार रूपये मानधन सुरू करावे, राज्यातील गायरान जमीन अतिक्रमण धारकांना इतर शेतकऱ्यांप्रमाणे सर्व शासकीय योजनेचे लाभ देण्यात यावे, रमाई घरकुल व प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या अनुदानात ग्रामीणसाठी १ लाख २० हजारांहून २ लाख ५० हजार करण्यात यावे, शहरी भागातील रमाई प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २ लाख ५० हजारावरुन ३ लाख ५० हजार करण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश आहे. निवेदनावर श्रमिक हक्क अभियानचे अध्यक्ष ज्ञानेश्वरभाऊ सूर्यवंशी, ...पान ६ वर

# भिवंडीतील विस्डम अकादमी शाळेतून काढून टाकलेल्या विद्यार्थ्यांना पोस्टाने पाठविले दाखले

## शिक्षा सुधार समिती कडून महापालिकेसमोर मेरी पाठशाळा आंदोलन



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील विस्डम अकादमी इंग्लिश स्कूल या शाळेने विद्यार्थ्यांसह पालकांचे वर्तन चांगले नसल्याने शाळा प्रशासनाने सहा विद्यार्थ्यांना शाळेतून काढून टाकत त्यांच्या नावे पोस्टाने शाळेतून काढल्याचे दाखले पाठवून दिल्याने पालकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. विशेष म्हणजे या मध्ये तीन विद्यार्थी हे शिक्षण हक्क अधिनियमद्वारे ऑनलाइन द्वारे प्रवेश घेतलेले होते. यामुळे विद्यार्थ्यासह पालकांमध्ये प्रचंड अक्रोश असून कॉम्रेड विजय कांबळे यांच्या नेतृत्वाखालील शिक्षा सुधार समितीच्या वतीने पालिका प्रशासन या बाबत कोणतीही कारवाई खाजगी शाळांवर करीत नसल्याने पालिका मुख्यालय समोर मेरी पाठशाळा हे अभिनव आंदोलन ५ जानेवारी पर्यंत सुरू केले आहे. ज्यामध्ये अनेक विद्यार्थी रस्त्यावर अभ्यासाचे धडे गिरवीत बसले आहेत. भिवंडीतील गुलजारनगर येथे विस्डम अकादमी इंग्लिश स्कूल असून या खाजगी शाळेत सुमारे ८५० विद्यार्थी शिक्षण घेत असताना मागील तीन वर्षापासून शाळेने वाढीव फी आकारल्याने पालकां सोबत वाद सुरू झाला होता.हा वाद वाढत गेल्याने काही पालकांनी महानगरपालिका, जिल्हा परिषद शिक्षण विभाग व शिक्षण उपसंचालक यांच्या कडे शाळेच्या फी वाढी संदर्भात तक्रार केली होती. त्या रागातून चौकशी सुरू झाल्याने त्याचा राग मनात ठेवून शाळा व्यवस्थापनाने बिलाल रेहान अन्सारी इयत्ता ५वी, उबेदरजा रेहान अन्सारी इयत्ता ३ री, मोमीन मोहम्मद सजल इयत्ता ५वी, मोहम्मद हासीब मोमीन इयत्ता ५वी, सलमानी अब्दुल रेहमान मोहम्मद अफाक इयत्ता ४थी, अन्सारी मोहम्मद अयान इयत्ता ३री अशा विद्यार्थ्यावर ही कारवाई शाळा प्रशासनाने केली आहे.त्यासाठी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे वर्तन चांगले नसल्याचे, शाळेतील शिक्षक, कर्मचारी यांना अपमानास्पद वागणूक देत असून, फी मागितली असता पालक कर्मचाऱ्यांना शाळेच्या ...पान ६ वर

# चक्रधर, प्राथमिक व माध्यमिक शाळेत वनभोजन उपक्रम साजरा



**औसा/प्रतिनिधी**

शहरातील उपक्रमशील शाळा चक्रधर प्राथमिक व माध्यमिक शाळेत वनभोजन हा सहशालेय उपक्रम राबविण्यात आला असून 'वनभोजन' उपक्रमांसाठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना परिसरातील तिरुपती बालाजी मंदिर गार्डन, याकतपूर रोड, औसा येथे सहलीचे आयोजन करण्यात आले. शिक्षणा बरोबर एक विरंगुळा म्हणून मुलांना याचाही एक वेगळा अनुभव मिळावा म्हणून वनभोजनाचे आयोजन करण्यात आले, सतत अभ्यास आणि पुस्तकाचे ओझे सांभाळणारी ही मुलं एका दिवसासाठी का होईना 'मोकळ्या हवेत, मोकळा श्वास' आणि जगण्यातला आनंद घेता येईल त्यानिमित्ताने शहरातील चक्रधर प्राथमिक व माध्यमिक शाळा गेली अनेक वर्षापासून वेगवेगळ्या संकल्पना राबवून मुलांना निसर्ग आणि संस्कृतीची आवड कशी निर्माण होईल याकडे लक्ष दिले जात आहे. वाढत्या शहरीकरण आणि मोबाईल युगामुळे मुलांमध्ये या गोष्टीची उणीव भासत आहे. शालेय विद्यार्थ्यां, मुलांमध्ये कष्ठ आणि सामाजिक बांधिलकी जोपासली गेली पाहिजे, यासाठी असे उपक्रम राबविणे गरजेचे बनले आहे असे मत व्यक्त मुख्याध्यापक सुलतान शेख, मोईज शेख यांना वाटते. रानातील वनाच्या वनभोजनाचा एक आनंद मिळतो. ...पान ६ वर

# अखेर वर्षभरातही भिवंडीतील स्व.मीनाताई ठाकरे रंगायतनाच्या दुरुस्तीला मिळेना मुहूर्त...

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बनविण्यात आलेले परंतु सध्या नादुरुस्त झाल्याने मागील चार वर्षापासून बंद पडून अडगळीत पडलेल्या स्व.मीनाताई ठाकरे रंगायतनाच्या दुरुस्तीला २०२२ या वर्षाचा मुहूर्तही मिळाला नाही त्यामुळे येथील नाट्य रसिक मनपा प्रशासना विरोधात तीव्र संताप व्यक्त करत आहेत.



भिवंडी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी १९९६ मध्ये स्व मीनाताई ठाकरे हे भलेमोठे नाट्यगृह बनविण्यात आले परंतु बाजारपेठेतील अरुंद रस्ते व दाटिवाटीमुळे येथे पोहचण्यासाठी नाट्यकर्मीना होत असलेल्या त्रासापाई या ठिकाणी सुरवाती पासून नाट्यकर्मी कधी फिरकलेच नाही, त्यामुळे हे नाट्यगृह शहरातील शाळां महाविद्यालय यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसह सभा संमेलन याच कामी उपयोगी आले आहे. दरम्यान या नाट्यगृहाच्या देखभाल व दुरुस्तीकडे आर्थिक कारण देत महानगरपालिका प्रशासनासह लोकप्रतिनिधी यांनी सदैव दुर्लक्ष केल्याने या नाट्यगृहाची सध्या वाताहत झाली असून मागील चार पाच वर्षापासून हे नाट्यगृह बंद करण्यात आले आहे. त्यामुळे भिवंडीतील कला प्रेमींमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. या नाट्यगृहाच्या दुरुस्ती साठी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत या नाट्यगृह दुरुस्तीसाठी दहा कोटी रुपये खर्चास मान्यता दिली. त्यानंतर निविदाही निघाल्या मात्र तांत्रिक अडचणींचे कारण देत नाट्यगृहाच्या दुरुस्तीस आज पर्यत मुहूर्त मिळालेला नाही. त्यामुळे हे नाट्यगृह आजही धूळखात पडले आहे. या संदर्भात बातम्या प्रसिद्ध केल्या नंतर या बातम्यांची दखल घेत स्वतः मुखमंत्री असलेल्या शिंदेंनी या नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी दहा कोटींची निधी मंजूर केली आहे मात्र शासकीय परवानग्या व इतर बाबींसाठी हे काम आजही रखडले त्यामुळे २०२२ या वर्षाचा नाट्यगृहाच्या दुरुस्तीचा मुहूर्तही हुकला असून नाट्य प्रेमींमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

# औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक कार्यक्रम जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाचे पत्रान्वये दि. २९ डिसेंबर २०२२ पासून औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असून निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. गुरुवार, दि. ५ जानेवारी २०२३ रोजी निवडणूक अधिसूचना जारी करण्यात येणार आहे. गुरुवार, दि. १२ जानेवारी २०२३ रोजी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस. शुक्रवार दि. १३ जानेवारी २०२३ रोजी अर्जाची छाननी. सोमवार, दि. १६ जानेवारी २०२३ रोजी अर्ज माघार घेण्याचा अंतिम दिवस. सोमवार, दि. ३० जानेवारी २०२३ रोजी मतदान प्रक्रिया सकाळी ८:०० ते दुपारी ४:०० पर्यत होणार आहे. गुरुवार, दि. २ फेब्रुवारी २०२३ रोजी मतमोजणी केली जाणार आहे.







